RNI : MAHMAR/2022/88796

www.vidarbhkesari.com Vidabh Kesari News 90969 45629 @vidarbhkesari

vidarbhkesari21@gmail.com

दैनिक

# विदर्भ केसरी

विदर्भाचा मानबिंदू

मुख्य संपादक : अमोल कंटाळे

www.vidarbhkesari.com

अमरावती

२३ शुक्रवार जानेवारी २०२६

✻ वर्ष ५ ✻ अंक २३८

✻ पृष्ठ : ४ ✻ मूल्य रु : ३

जयंतीनिमित्त अभिवादन!



नेताजी सुभाषचंद्र बोस



हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे

# १५ महापालिकांमध्ये महिलाराज

## मुंबई, पुण्यात महिलाच कारभारी, २९ मनपांच्या महापौरपदाची आरक्षण सोडत जाहीर मुंबईच्या आरक्षणावरून वाद ठाकरे गटाचा फिक्सिंगचा आरोप

**▸विदर्भ केसरी।मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील २९ पैकी निम्म्याहून अधिक म्हणजे १५ महापालिकांच्या महापौरपदावर महिला विराजमान होणार आहेत. मुंबईसह नवी मुंबई, नाशिक, पुणे, नागपूरसह नांदेड या राजकीयदृष्ट्या महत्वाच्या महापालिकांच्या कारभाराची सूत्रे महिलांच्या हाती येणार आहेत. जालना आणि लातूरचे महापौरपद अनुसूचित जाती प्रवर्गातील महिलेसाठी आरक्षित झाले आहे तर मुंबई, नागपूर, पुणे, नवी मुंबईसह ९ मनपांमध्ये सर्वसाधारण महिला प्रवर्ग, ८ महापालिकांत ओबीसी प्रवर्गाचे महापौर होणार असून अकोला, चंद्रपूर, अहिल्यानगर आणि जळगाव ओबीसी महिला प्रवर्गासाठी राखीव असणार आहे. तसेच १७ महापालिकांमध्ये सर्वसाधारण प्रवर्गातील महापौर होणार असून, यापैकी ९ महापालिकांमध्ये महिलांना महापौर पदावर संधी मिळणार आहे.



नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी मंत्रालयातील परिषद सभागृहात २९ महानगरपालिकांमधील महापौरपदाची आरक्षण सोडत काढण्यात आली. महापौर पदाच्या पहिल्या अडीच वर्षासाठी काढण्यात आलेल्या या सोडतीत अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी २९ पैकी १ पद आरक्षित झाले आहे. अनुसूचित जाती प्रवर्गासाठी ३ पदे आरक्षित झाली असून, त्यापैकी २ पदे अनुसूचित जातीमधील महिला प्रवर्गासाठी आरक्षित झाली आहेत.

नागरिकांचा मागास प्रवर्ग या प्रवर्गासाठी ८ पदे आरक्षित झालेली असून, त्यापैकी ४ पदे या प्रवर्गातील महिलांसाठी आरक्षित झाली आहेत. उर्वरित १७ महानगरपालिकांमधून सर्वसाधारण महिला या प्रवर्गासाठी ९ पदे येत असून बाकीची ८ महापौर पदे खुली म्हणजे सर्वसाधारण प्रवर्गासाठी आहेत.

दरम्यान, मुंबईचे महापौरपद रोस्टर प्रमाणे ओबीसी अनुसूचित जमाती महिलेकडे जाणे अपेक्षित असताना नियमबा पद्धतीने आरक्षण काढले गेल्याचा आक्षेप ठाकरे गटाने घेतला आहे. सत्ताधारी पक्षाने स्वत:चे बहुमत लक्षात घेऊन लॉटरी काढल्याचा आरोप ठाकरे गटाच्या किशोरी पेडणेकर यांनी केला तर नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी संपूर्ण प्रक्रिया पूर्ण पारदर्शकतेने आणि नियम पाळूनच पार पाडण्यात आली आहे. ठाकरे गटाला जे हवे होते ते न झाल्याने त्यांनी आरडाओरड केल्याचे स्पष्ट केले.

### आरक्षण पुढीलप्रमाणे....

- महापौर पदाचे प्रवर्गनिहाय आरक्षण आणि महापालिका
- -अनुसूचित जमाती : कल्याण-डोंबिवली
- -अनुसचित जाती : ठाणे
- -अनुसूचित जाती महिला : जालना आणि लातूर
- -नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला : जळगाव, चंद्रपूर, अहिल्यानगर, अकोला
- -नागरिकांचा मागास प्रवर्ग : पनवेल, इचलकरंजी, कोल्हापूर, उल्हासनगर
- -सर्वसाधारण महिला : पुणे, धुळे, बृहन्मुंबई, नवी मुंबई, नांदेड-वाघाळा, मालेगाव, मिरा- भाईंदर, नागपूर, नाशिक.
- -सर्वसाधारण : छत्रपती संभाजीनगर, परभणी, सांगली-मिरज-कुपवाड, अमरावती, वसई-विरार, सोलापूर, पिंपरी-चिंचवड, भिवंडी-निजामपूर.

### म्हणून मुंबईत अनुसूचित जमातीचे आरक्षण नाही

- नगरविकास विभागाच्या २००६ च्या नियमानुसार अनुसूचित जमातीसाठी संबंधित महापालिकेत किमान तीन प्रभाग हे अनुसूचित जमातीसाठी आरक्षित असले पाहिजेत. मुंबई, महापालिकेत अनुसूचित जमातीसाठी फक्त दोन प्रभाग आरक्षित आहेत. त्यामुळे मुंबईचे महापौर पद अनुसूचित जमातीसाठी आरक्षित होत नाही अशी माहिती यावेळी देण्यात आली.

### महापौर पदासाठी इच्छुकांची मोर्चेबांधणी

- महापौर पदाचे आरक्षण निश्चित झाल्याने या पदासाठी आता इच्छुकांची मोर्चेबांधणी सुरु झाली आहे. मुंबईचे महापौर पद भाजप स्वत:कडे ठेवणार असल्याने भाजपमध्ये अनेक महिला इच्छुक आहेत. भाजपच्या महापौर पदाचा निर्णय हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या स्तरावर होणार असल्याचे समजते तर ठाणे कल्याण-डोंबिवलीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हेच महापौर पदाचे उमेदवार निश्चित करणार आहेत.

## मुंबईत सरकारने ST प्रवर्गाला डावलले

**▸विदर्भ केसरी।**

राज्यातील 29 महानगरपालिकांच्या महापौरपदाच्या आरक्षणाची सोडत आज मंत्रालयात पार पडली. या सोडतीनंतर अनेक महापालिकांमधील आरक्षण स्पष्ट झालं असलं, तरी मुंबई महापालिकेच्या महापौरपदाच्या आरक्षणावरून मोठा वाद निर्माण झाला आहे. या संपूर्ण प्रक्रियेवर शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या आणि माजी महापौर किशोरी पेडणेकर यांनी तीव्र आक्षेप नोंदवला आहे. मुंबईच्या आरक्षण सोडतीत पारदर्शकता नसल्याचा गंभीर आरोप करत त्यांनी राज्य सरकार आणि सत्ताधाऱ्यांवर थेट निशाणा साधला आहे. ही सोडत ठरावीक राजकीय हितसंबंध लक्षात घेऊन काढण्यात आल्याचा संशयही त्यांनी व्यक्त केला आहे. किशोरी पेडणेकर यांनी सर्वात मोठा मुद्दा अनुसूचित जमाती (ST) प्रवर्गाबाबत उपस्थित केला आहे. मुंबई महापालिकेत ST प्रवर्गातून दोन नगरसेवक निवडून आले असताना, महापौरपदाच्या आरक्षणासाठी चिठ्ठी काढताना हा प्रवर्ग वगळण्यात का आला, असा थेट सवाल त्यांनी केला. जर ST प्रवर्गाचे नगरसेवक महापालिकेत आहेत, तर मग त्या प्रवर्गासाठी आरक्षण का ठेवण्यात आलं नाही? असा प्रश्न उपस्थित करत त्यांनी या निर्णयामागे राजकीय हेतू असल्याचा आरोप केला. महायुतीकडे ST प्रवर्गातील नगरसेवक नसल्यामुळेच हा प्रवर्ग जाणीवपूर्वक बाजूला ठेवण्यात आला का, असा संशयही त्यांनी व्यक्त केला.

## वन विभागातील पथकाची भेट

**▸विदर्भ केसरी। मानोरा,**

वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्या अधिपत्याखाली येणाऱ्या गिरोली वन वर्तुळातील सावरगांव बिटात वस्तीच्या शेजारी रात्री वाघ सदृश्य हिंस्त्र प्राणी दिसल्याने या गावातील घाबरलेल्या नागरिकांना धाडस देण्याकरिता वन प्रशासनातील कर्मचाऱ्यांचे पथक आज, २२ जानेवारी सावरगांव कान्होबा येथे दाखल झाले होते. सावरगांव कान्होबा गावाला लागून शेकडो हेटर वन परिसरातील वन व्याप्त भागांमध्ये मोठ्या प्रमाणात तृणभक्षी व काही प्रमाणात मांसभक्षी हिंस्त्र प्राण्यांचा नैसर्गिक अधिवास आहे. पक्षाचा पाठलाग करताना आणि बऱ्याच वेळा सावजाच्या शोधात शिकारी प्राणी गाव कुसाकडे आपला मोर्चा या भागात वळवीत असतात त्याचाच प्रत्येक दोन दिवसापूर्वी सावरगांव कान्होबा तांड्याच्या सीमेवर हिंस्त्र प्राण्याचे दर्शन स्थानिक नागरिकांना झाल्याने या गावातील व तांड्यातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. अखेर त्या ठिकाणी वनविभागाने भेट दिली.

## दावोसमध्ये महाराष्ट्राचा डंका!

**▸विदर्भ केसरी।**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सध्या दावोसच्या दौऱ्यावर आहेत. यावेळी इथून महाराष्ट्रात किती गुंतवणूक आली आहे तसेच राज्याच्या कोणत्या भागात व कोणत्या क्षेत्रात गुंतवणूक आली आहे, यांची माहिती देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, दावोस दौरा यह अतिशय यशस्वी झाला आहे. मला सांगताना आनंद वाटतो की जवळपास गुंतवणुकीचे करार जे केले आहेत ते 30 लाख कोटी रुपयांचे आहेत. अजून 7-10 लाख कोटी पुढच्या काळात होणार आहे. ही जी काही गुंतवणूक आहे, यात इंडस्ट्री सेक्टर आहे, सर्व्हिस सेक्टर आहे, कृषी क्षेत्र आहे, सगळ्याच क्षेत्रात गुंतवणूक आपल्याकडे येत आहे. यातील 83 टक्के जे काही करार आहेत, यात एफडीआय आहे. 16 टक्के गुंतवणूक अशी आहे ज्यात फायनॅनष्यल इंस्टीट्यूट असतील किंवा टेक्निकल आहेत, या गुंतवणुकी एफडीआय कमी आहे, पण फॉरेन टेक्नॉलजी आहेत.

आता गुंतवणूक आली कुठे? तर महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागात ही गुंतवणूक आली आहे. कोकणचे क्षेत्र असेल किंवा एमएमआरचे क्षेत्र आहे, विदर्भात 13 टक्के गुंतवणूक आली आहे.

### कोणत्या देशांतून गुंतवणूक आली?

- पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, एकूण किती देशातून गुंतवणूक आपल्याकडे येत आहे, याचा हिशोब लावला तर एकूण 18 देशातून ही गुंतवणूक आपल्याकडे येत आहे. यात अमेरिका, यूके, स्वित्झर्लंड, स्वीडन, सिंगापुर, नेदरलँड, जपान, इटली, यूएई, डेन्मार्क, नॉर्वे, फिनलंड, स्पेन, कॅनडा, बेल्जियम, ऑस्ट्रीया, अशा अनेक देशांतून गुंतवणूक येत आहे. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे, महाराष्ट्राचे परफॉर्मंस सगळ्यात चांगला राहिला आहे. एक प्रकारे या कागदावरच्या घोषणा नाहीत. अनेकवेळा लोकांचा गैरसमज होत असतो, या गुंतवणुकीचा कालावधी जो असतो, हा 3 वर्षांपासून ते 7 वर्षांपर्यंत असते.

### कोणत्या क्षेत्रात गुंतवणूक झाली?

- देवेंद्र फडणवीस म्हणाले, अनेक मोठ्या कंपन्या आपल्याकडे गुंतवणूक करण्यास तयार झाले आहेत. यासोबत कुठल्या क्षेत्रात गुंतवणूक येत आहे ते देखील महत्त्वाचे आहे. यात क्वांटम कम्प्यूटिंग, एआय डेटा सेंटर, एआय टेक्नॉलजी, इलेक्ट्रॉनिक्स, फॅब सेमीकंडक्टर्स, जीसीसी, आपल्याकडे नवीन वेव ही जीसीसीची आहे. तसेच फूड प्रोसेसिंग, रिनिवेबल एनर्जि, ग्रीन स्टील, ईव्ही, अर्बन ट्रांस्फॉर्मेशन, शिप बिल्डिंग, एड्युकेशन, फीनटेक, मॅजिस्टिक आणि टेक्सटाइल तसेच डिजिटलमध्ये गुंतवणूक आली आहे.

## मनरेगा बचाव' आंदोलन



**यवतमाळ : संविधान चौक,यवतमाळ येथे यवतमाळ जिल्हा कॉंग्रेस कमिटीच्या वतीने गुरुवारी (ता.२२) 'मनरेगा बचाव' आंदोलन करण्यात आले. यावेळी प्रामुख्याने माणिकराव ठाकरे प्रभारी- गोवा, दीव-दमन, माजी मंत्री शिवाजीराव मोघे, माजी मंत्री वसंतराव पुरके, आमदार बाळासाहेब मांगुळकर, डॉ. वजाहत मिर्झा, जिल्हाध्यक्ष अॅड. प्रफुल्ल मानकर यांचा समावेश होता.तसेच जिल्हा प्रभारी भय्याजी पवार, महिला जिल्हाध्यक्ष वंदनाताई अवारी, प्रदेश सरचिटणीस अशोकराव बोबडे, जावेद अन्सारी, सेवादल जिल्हाध्यक्ष राजीव कासावार, तालुकाध्यक्ष रमेश बिसणकर, शहराध्यक्ष बबलू देशमुख, जाफर खान, जावेद अन्सारी, प्रकाश जानकर, गटनेत्या वैशाली सवाई, स्वाती येंडे, यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी या आंदोलनात सहभाग नोंदवून सरकारचा निषेध केला.**

## चिमुकलीवर चालकाकडून लैंगिक अत्याचार

**▸विदर्भ केसरी।**

बदलापूर पश्चिम परिसरातून माणुसकीला काळिमा फासणारी एक अत्यंत संतापजनक घटना समोर आली आहे. शाळेतून घरी परतणाऱ्या एका अवघ्या चार वर्षांच्या निष्पाप चिमुकलीवर स्कूल व्हॅनच्या चालकानेच लैंगिक अत्याचार केल्याचे उघड झाले आहे. काही महिन्यांपूर्वी घडलेल्या अशाच एका घटनेच्या जखमा ताज्या असतानाच, या नवीन प्रकरणाने संपूर्ण बदलापूर शहर पुन्हा एकदा हादरले असून पालकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे.

पीडित चिमुकली नेहमीप्रमाणे शाळे सुटल्यानंतर स्कूल व्हॅनने घरी परतत होती. याच प्रवासादरम्यान नराधम चालकाने तिला आपल्या पाशवी वासनेचे शिकार बनवले. घरी पोहोचल्यानंतर या घाबरलेल्या चिमुकलीने घडलेला सर्व प्रकार आपल्या आई-वडिलांना सांगितला. नराधम आरोपीने केवळ अत्याचारच केला नाही, तर तिला मारहाण करून कोणालाही न सांगण्याची धमकीही दिली होती. मुलीने सांगितलेली हकीकत ऐकून पालकांना मोठा धक्का बसला.

या घटनेची माहिती मिळताच संतप्त पालकांनी तातडीने बदलापूर पश्चिम पोलिस ठाण्यात धाव घेतली. पोलिसांनी घटनेचे गांभीर्य ओळखून तातडीने कारवाई करत आरोपी व्हॅन चालकाला बेड्या ठोकल्या आहेत. या प्रकरणी विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पीडित मुलीची वैद्यकीय तपासणी केली जात आहे. शाळेत जाणाऱ्या चिमुकल्यांच्या सुरक्षेचा प्रश्न या घटनेमुळे पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

बदलापुरातील या ताज्या घटनेचे पडसाद शहरात उमटू लागले असून राजकीय आणि सामाजिक वातावरण कमालीचे तापले आहे. या प्रकरणातील संताप व्यक्त करण्यासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या नेत्या संगीता चेंदवणकर यांनी आपल्या सहकाऱ्यांसह संबंधित स्कूल व्हॅनची तोडफोड करण्याचा प्रयत्न केला. चिमुकल्यांच्या सुरक्षेबाबत वारंवार घडणाऱ्या या गंभीर प्रकारांमुळे नागरिकांमध्ये प्रशासनाविरुद्ध प्रचंड रोष असून, शहरात पुन्हा एकदा आंदोलनाची ठिणगी पडण्याची चिन्हे दिसत आहेत.

## महापौर पदासाठी 'आरक्षण फिक्सिंग'?

**▸विदर्भ केसरी।**

नागपुरातील महापौर पदासाठी आरक्षणात घोळ घालण्यात आल्याचा गंभीर आरोप कॉंग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. नागपूरमध्ये सर्वसाधारण महिला आरक्षण लागू होत असतानाच भाजपने आधीच आपली उमेदवार निश्चित केल्याचा दावा त्यांनी केला. भाजपकडून शिवानी दानी या महापौर पदाच्या उमेदवार असणार असल्याचे नावही वडेट्टीवार यांनी जाहीर केले.

विजय वडेट्टीवार म्हणाले की, हे आरक्षण फिक्सिंग आहे, असे मी काही दिवसांपूर्वीच सांगितले होते. नागपुरात महापौर पदाचा उमेदवार आधीच ठरवण्यात आला असून आज मी त्यांचे नाव जाहीर करतो. शिवानी दानी या भाजपच्या महापौर पदाच्या उमेदवार असतील,असा घणाघाती आरोप वडेट्टीवार यांनी केला.

आरक्षण प्रक्रियेत सुरू असलेल्या कथित गोंधळावर बोलताना विजय वडेट्टीवार यांनी शिवसेनेच्या भूमिकेचे समर्थन केले. आरक्षणावर शिवसेनेने घेतलेले आक्षेप पूर्णपणे योग्य आहेत. गरज भासल्यास हे प्रकरण न्यायालयात जाण्याचीही शक्यता आहे, असेही वडेट्टीवार म्हणाले. नागपुरातील महापौर पदाच्या निवडीवरून आता राजकीय वाद आणखी तीव्र होण्याची चिन्हे दिसत आहेत.

नागपूर महानगरपालिकेसाठी 15 जानेवारी रोजी मतदान प्रक्रिया पार पडली होती, तर 16 जानेवारीला निकाल जाहीर झाला. एकूण 151 जागांसाठी झालेल्या या निवडणुकीत भाजपने मोठे यश मिळवत 102 जागांवर विजय मिळवला आणि सर्वात मोठा पक्ष ठरला.

## 50 हजार शेतकऱ्यांच्या जिद्दीसमोर प्रशासन नमले

**▸विदर्भ केसरी।**

ठाणे-पालघर जिल्ह्यामध्ये होत असलेले वाढवण व मुरबे बंदर रद्द करा, कसत असलेल्या जमिनी शेतकऱ्यांच्या नावे करा, स्मार्ट मीटर रद्द करा इत्यादी मागण्यांसाठी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने १९ ते २१ जानेवारी २०२६ या काळात चारोटी ते पालघर असा ५०,००० शेतकऱ्यांचा जबरदस्त लॉंग मार्च काढण्यात आला. दोन दिवस सुमारे ६० किमी पायी चालत शेतकरी पालघर जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकले. लॉंग मार्चच्या तिसऱ्या दिवशी तब्बल ७ तास स्थानिक मागण्यांबाबत पालघरच्या जिल्हाधिकारी डॉ. इंदुराणी जाखड आणि सर्व संबंधित खात्यांचे अधिकारी यांच्यासोबत माकपच्या शिष्टमंडळाने सविस्तर चर्चा केली.



या चर्चेनंतर जिल्हाधिकाऱ्यांनी आपल्या सहीने मोर्चाच्या मागण्यांवर समयबद्ध लेखी आश्वासने दिल्यानंतरच २१ जानेवारीला रात्री उशिरा हे आंदोलन स्थगित केल्याची घोषणा हजारोंच्या सभेसमोर माकपचे नेते डॉ. अशोक ढवळे, आमदार विनोद निकोले व किरण गहला यांनी विजयाच्या प्रचंड जल्लोषात केली.

या आंदोलनाला अखिल भारतीय किसान सभा, सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन्स, अखिल भारतीय जनवादी महिला संघटना, डेमोक्रॅटिक युथ फेडरेशन ऑफ इंडिया, स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया, आणि आदिवासी अधिकार राष्ट्रीय मंच या संघटनांनी संपूर्ण व सक्रिय पाठिंबा दिला होता.

या जबरदस्त आंदोलनात पालघर जिल्ह्यातील डहाणू, तलासरी, जव्हार, मोखाडा, विक्रमगड, वाडा, वसई व पालघर या आठही तालुक्यांतून प्रत्येकी हजारों श्रमिक स्त्री-पुरुष या आंदोलनात त्वेषाने सहभागी झाले होते. त्यातील बहुसंख्य जण हे अर्थात आदिवासी होते. सरकारशी झालेल्या वाटाघाटींमध्ये वनाधिकार कायद्याच्या अंमलबजावणीत येत असलेल्या समस्यांबद्दल सकारात्मक भूमिका जिल्हाधिकारी यांनी घेतली. ३० एप्रिल २०२६ पर्यंत सर्व प्रलंबित दावे निकाली काढण्याचे त्यांनी मान्य केले व त्यासाठी ठोस आदेश दिले. ज्या अनेक शेतकरी दावेदारांना ते कसत असल्यापेक्षा कमी जमीन मिळाली, त्यांच्या जमिनीची शासकीय अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष स्थळपाहणी करावी असेही ठरले. त्याचबरोबर वरकस, देवस्थान, इनाम, सरकारी, तळघर व बेनामी जमिनी नावे करण्यासाठी कालबद्ध कृती करण्याचे मान्य करण्यात आले. अपर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली व मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या व किसान सभेच्या पाच कार्यकर्त्यांचा समावेश असलेली एक समितीही यासाठी तातडीने गठीत करण्यात आली. देवस्थान इनाम जमिनीबद्दल राज्य सरकार तातडीने कायदा करणार असून त्या विधेयकाचा मसुदा किसान सभेला देण्यात आला. अकोले ते लोणी लॉंग मार्चच्या वेळी दिलेल्या आश्वासनाप्रमाणे वरकस जमिनीबद्दल अद्यापही कारवाई करण्यात आली नव्हती. पालघरच्या लॉंग मार्चमध्ये याबाबत ठोस कारवाई करण्याचे आश्वासन देण्यात आले.

- धरणांमधील पाण्यावर स्थानिकांचा हक्क, पिण्यासाठी व सिंचनासाठीच्या पाण्याला अग्रक्रम, रोजगार हमी कामांची उपलब्धता, पेसा कायद्याची अंमलबजावणी व रिक्त जागांवर तरुण-तरुणींची नोकरभरती, घरकुल योजनेखाली गरजूंना घरे, जल जीवन मिशनची प्रलंबित कामे, रेशन व्यवस्थेतील भ्रष्टाचार, जिल्हा परिषदेच्या शाळा, इत्यादी मागण्याही मान्य करण्यात आल्या.
- शेतकऱ्यांच्या व सर्वसामान्य जनतेच्या स्थानिक मागण्यांबाबत प्रशासनाने सकारात्मक प्रतिसाद दिला असल्याने पालघर येथील लॉंग मार्चनंतर सुरू करण्यात आलेला जिल्हाधिकारी कार्यालय घेराव स्थगित करण्याचा निर्णय मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने घेतला.

## घरचं सोनं गहाण ठेवून नकली सोन विकत घेतलं

**▸विदर्भ केसरी। वर्धा,**

दाम्पत्याला दोन किलो नकली सोने देऊन तिघांनी १० लाखांनी चुना लावला. ही घटना बजाज चौकातील रामदेवबाबा मंदिरात बुधवार २१ रोजी घडली. मांडगाव येथील संजय आंबटकर (४२) यांचे गावातच अनुराधा वस्त्रालय नावाने कापड दुकान आहे.

संजय व त्याची पत्नी शुभांगी दोघेही दुकानात होते. त्यावेळी अज्ञात महिला व दोन पुरुष दुकानात आले. त्यांनी आमच्याकडे सोने आहे. तुम्ही विकत घेता का असे म्हणून त्यांच्याजवळील पिशवीत पिवळ्या धातूचे मनी असलेल्या माळा दाखविल्या. त्यापैकी त्यांनी एका माळेतून दोन मनी काढून आंबटकर यांना दिले व तुम्ही चेक करून घ्या, खात्री पटली तर घ्या, असे म्हटले. आंबटकर यांनी मोहात पडून तुमच्याकडे किती सोने आहे, असे म्हटले. दुकानातील वजन काट्यावर सोने मोजले असता

ते २ किलो भरले. नंतर ते तिघेही तिथून निघून गेले. त्यानंतर आंबटकर यांनी गावातील सोनाराकडे जाऊन सोन्याची शुद्धता तपासली असता ते सोने असल्याची खात्री पटली. सायंकाळी आंबटकर यांना त्या अज्ञात महिलेचा फोन आला व तुम्ही मनी तपासले काय, असे म्हटले. त्यावर आंबटकर यांनी मनी सोन्याचे असल्याचे सांगितले. अज्ञात व्यतींनी २ किलो सोन्याची किंमत २५ लाख रुपये सांगितली. १० लाखांवर सौदा ठरला. त्या अज्ञातांनी त्यांना वर्धा येथील बजाज चौकातील रामदेव मंदिरात दुसऱ्या दिवशी पैसे घेऊन येण्यास सांगितले. आंबटकर यांनी त्यांच्या पत्नीचे दागिने बँकेत गहाण ठेऊन ७ लाख रुपयांचे कर्ज घेतले तर ३ लाख रुपये उसणे घेतले.

## अग्रलेख

# नेताजी सुभाषचंद्र बोस

*राष्ट्रकार्यासाठी आपली आयसीएसची सनद लाथाडणाऱ्या नेताजी सुभाषचंद्र बोस यांची आज जयंती. त्यांच्या विराट अशा राष्ट्रकार्याची पायाभरणी शालेय जीवनापासूनच कशी झाली, याचा परिचय करून देणारा हा लेख...*

*सुभाषचंद्र बोस जात्याच बंडखोर. क्रांतिकारी विचार त्यांच्या नसानसातून प्रवाहित झाला होता. शालेय जीवनापासूनच ब्रिटिश सत्तेविरुद्ध त्यांच्या मनात असंतोष निर्माण झाला होता. मानवजातीची सेवा करण्याची प्रेरणा त्यांनी स्वामी विवेकानंदांच्या साहित्यातून घेतली. शाळेत असताना वैराग्य आणि क्रांतिकारी विचारांनी सुभाषबाबू भारून गेले. पुढे आयुष्यभर त्याच विचारांचा प्रभाव त्यांच्या मनावर राहिला. कोलकात्यातील प्रेसिडेन्सी कॉलेजमध्ये शिकत असताना प्राध्यापकांशी मतभेद झाल्यामुळे सुभाषबाबूंना महाविद्यालयातून काढून टाकण्यात आले. ज्या ओटेन या प्राध्यापकाशी संघर्ष होऊन सुभाषबाबूंना महाविद्यालय सोडावे लागले, तोच ओटेन पुढे त्यांचा चाहता बनला. बलाढ्य ब्रिटिशांच्या अवाढव्य साम्राज्याला दंड थोपटून आव्हान देणारे सुभाष समस्त भारतीयांना वंदनीय ठरले, ते त्यांच्या त्यागी, विरागी, निर्भय, क्रांतिकारी धगधगत्या विचार-आचारामुळे.*

*पुढे दोन वर्षांनी सुभाषबाबूंना स्कॉटिश चर्च कॉलेजमध्ये प्रवेश मिळाला. याच महाविद्यालयात सुभाषबाबूंना प्रादेशिक सेनेत प्रवेश घेतल्यानंतर लष्करी प्रशिक्षण मिळाले. भविष्यात आझाद हिंद सेना उभी करताना याच लष्करी प्रशिक्षणाचा त्यांना अत्यंत उपयोग झाला. सुभाषबाबूंचे वडील जानकीनाथ हे कोलकात्यातील नावाजलेले वकील. सुभाषबाबूंचे सगळ्यात मोठे भाऊ शरदचंद्र हे विलायतेला जाऊन बॅरिस्टर होऊन आले होते. तीक्ष्ण बुद्धीच्या सुभाषबाबूंनी इंग्लंडला जाऊन भारतीय प्रशासन सेवा (इंडियन सिव्हिल सर्व्हिसेस) परीक्षा उत्तीर्ण होऊन यावा, असे जानकीनाथांना वाटत होते. आयसीएस म्हणजे सर्व प्रकारच्या सुखविलासांची मोठी संधी होती. ब्रिटिशांच्या सेवेचा तो मानबिंदू मानला जात असे. पण, आयसीएस होण्याचा विचार, ब्रिटिश साम्राज्यविरोधी प्रखर विचार असणाऱ्या सुभाषबाबूंच्या गळी उतरवणे हे महाकठीण कर्म होते. बॅरिस्टर शरदचंद्रांनी सुभाषबाबूंची समजूत घालून त्यांना इंग्लंडला जाऊन शिकण्यासाठी राजी केले. सुभाषबाबू आयसीएसच्या परीक्षेत चौथ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले. एक आव्हान म्हणून दिलेली आयसीएसची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर मात्र त्या सेवेत सामील होण्याची त्यांची मुळीच इच्छा नव्हती. आयसीएस झाल्यानंतर ते मुंबईला आले. त्यांनी महात्मा गांधींची भेट घेतली. देशाचे सर्वमान्य नेते महात्मा गांधी यांनी तेव्हा एका वर्षात स्वराज्य ही घोषणा केली होती. 1921 हे वर्ष उजाडण्याच्या आत आपला देश ब्रिटिशांच्या जोखडातून मुक्त होईल, ही घोषणा आकर्षक असली, तरी एक वर्षात स्वराज्य कसे मिळणार, हे सुभाषना समजले नाही. पण राष्ट्रकार्यात झोकून देण्याची इच्छा असल्याचे त्यांनी गांधीजींना सांगितले. गांधीजींनी त्यांना बंगालमधील थोर नेते बाबू चित्तरंजन दास यांची भेट घ्यायला सांगितले. चित्तरंजन दास हे देशबंधू म्हणून ओळखले जायला लागले होते. सुभाषबाबू कोलकत्याला पोहोचताच त्यांनी देशबंधूंची भेट घेतली. त्यांच्याशी चर्चा केली. देशबंधूंचे विचार ऐकता ऐकताच सुभाषनी नकळतच त्यांचे शिष्यत्व पत्करले. त्यांनी प्राप्त केलेली आयसीएस ही पदवी आता त्यांच्या मार्गातील अडथळा ठरला होता. ज्यांनी मोठ्या अपेक्षा धरून आपल्याला इंग्लंडला पाठवले, त्या जानकीनाथांची समजूत कशी घालायची हा प्रश्न त्यांच्यापुढे पडला होता. त्यांना आयसीएस परीक्षा देण्यासाठी ज्या शरदबाबूंनी त्यांचे मन वळवले होते, त्याच शरदबाबूंची आपल्या वडिलांचे मन वळवण्यासाठी सुभाषबाबूंनी विनवणी केली. क्रांतिकारक विचाराच्या आपल्या या जगावेगळ्या पुत्राचे मन ओळखून जानकीनाथांनी आयसीएसचा त्याग करण्याची संमती सुभाषबाबूंना दिली. सर्व सुखे हात जोडून समोर उभी असणारी असणारी आयसीएसची मानाची सनद सुभाषचंद्रांनी सहजपणे ब्रिटिशांकडे भिरकावली आणि ते राष्ट्रकार्यात सहभागी झाले.*

# जिल्ह्यातील ६० प्रकरणे 'ऑन द स्पॉट' निकाली

**विदर्भ केसरी।, प्रतिनिधी**

### आमदार सुधाकर अडबाले यांच्या पुढाकाराने समस्या निवारण सभा



जिल्ह्यातील खासगी अनुदानित माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळांतील कार्यरत शिक्षक- शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित समस्या निवारणार्थ सहविचार सभा २१ जानेवारी जानेवारी रोजी शिक्षणाधिकारी (माध्य.) कार्यालय, जि. प. यवतमाळ येथे पार पडली. तीन तास चाललेल्या सहविचार सभेत आमदार सुधाकर अडबाले यांच्या पुढाकाराने ६० प्रकरणे 'ऑन द स्पॉट' निकाली काढण्यात आली.

सभेत माध्यमिक विभागातील प्रलंबित विविध सामुहिक व वैयक्तिक विषयांवर चर्चा करण्यात आली. २०१५-१६ कार्यकाळातील जिपीएफ, भविष्य निर्वाह निधी, अर्जित रजा रोखिकरण बिल, एन.पी.एस खात्याबाबत तसेच थकबाकीचे देयके, वरिष्ठ श्रेणी प्रस्ताव, वैद्यकीय देयके त्वरित निकाली काढण्याबाबत आमदार सुधाकर अडबाले यांनी अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. प्रलंबित प्रकरणे आमदार अडबाले यांनी तात्काळ काढण्यास सांगून १ मुख्याध्यापक मान्यता, २ वरिष्ठ श्रेणी व ५७ वैद्यकीय देयके 'ऑन दि स्पॉट' मान्यतेचे पत्र देण्यात आले. शिक्षकांच्या समस्या तात्काळ निकाली काढण्यासाठी आमदार अडबाले यांनी अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. तसेच भविष्य निर्वाह निधी पावत्या ३१ मार्च २०२६ पर्यंत न मिळाल्यास जिल्हा कार्यकारिणी १ एप्रिल पासून शिक्षण अधिकारी कार्यालयासमोर उपोषण करणार असल्याचे जिल्हाध्यक्ष पवन बन यांनी सभेत सांगितले.

सदर सभेला शिक्षणाधिकारी (माध्य.) किशोर पागोरे, उपशिक्षणाधिकारी गोडे, वेतन पथक अधीक्षक वानखडे, विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे प्रांतीय अध्यक्ष अरविंद देशमुख, अमरावती शिक्षक मतदार संघाचे अधिकृत उमेदवार दिलीप कडू, वर्धा जिल्हा कार्यवाह महेंद्र सालंकार, यवतमाळ जिल्हाध्यक्ष पवन बन, जिल्हा कार्यवाह रामकृष्ण जीवतोडे, महामंडळ सदस्य आनंद मेश्राम, मनोज जिरापुरे, मुरलीधर धनरे, मंगला वडतकर, श्रावणसिंग वडते, श्याम बोढे, अशोक आकूलवार, विजयराव विसपुते, गुलाब सोनवणे, श्रीकांत अंदुरकर, साहेबराव धात्रक, सुरेंद्र कडू, भूमन्ना भूमकंटीवार, भूपेंद्र देरकर, संतोष हेडाऊ, उमाकांत राठोड, नागोराव चौधरी, डॉ. इर्शाद खान, इमरान, विनोद मंगाम, गुंडेवाड, नितीन गावंडे व संघटनेचे इतर पदाधिकारी तसेच समविचारी संघटनांचे पदाधिकारी व समस्याग्रस्त शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# ...तर कचरा थेट पालिकेत आणून टाकणार

**विदर्भ केसरी।, जि.प्र.**

**यवतमाळ** : गत काही वर्षांपासून प्रशासकराजमुळे विकास खंडीत झाला होता, असे चित्र होते. परंतु, आता नुकतीच पालिकेवर सत्ता विराजमान झाली. तरी देखील वॉर्डात विकासाचा श्रीगणेशा झालाच नाही. अनेक प्रभागात नालीसफाई, स्वच्छता, घंटागाडी फिरत नसल्याने नागरिक अस्वच्छतेच्या विळख्यात अडकले आहे. याबाबत नगरसेवकांना अवगत करुनही हा भाग आमच्याकडे येत नाही, असे उत्तर रहिवाशांना दिले. संतप्त रहिवाशांनी गुरुवारी (ता.२२)थेट पालिका मुख्याधिकाऱ्यांना, जिल्हाधिकाऱ्यांना निवेदनातून समस्या सोडविण्याची मागणी केली आहे.

शिवनगरवासीयांनी निवेदनात नमुद केले की, गेल्या अनेक दिवसांपासून शिवनगर या भागात नालीसफाई, स्वच्छता, घंटागाडी न फिरल्याने अनेक समस्या उदभवल्या आहेत. याबाबत नगरसेवकांना अवगत केले असता आमच्या हद्दीत येत नाही असा सपशेल नकार दिला आहे. मागील पंचवार्षिक प्रमाणे याही पंचवार्षिकमध्ये जशास तसा असलेला मागील पंचवार्षिकचा प्रभाग २३ व आताचा प्रभाग २७ आमच्या हद्दीत शिवनगर येत नाही अशा पद्धतीने सांगून नगरसेवक यांनी जाणून बुजून घंटागाडी व नालीसफाई करीता कुठलाही कर्मचारी १५ ते २० दिवसांपासून पाठविला नाही. आता दोन्ही नगरसेवक कामे करण्यास टाळाटाळ करीत आहे असा आरोप देखील निवेदनात करण्यात आला आहे.

निवेदनावर सोमेश चौधरी, शंकरराव ईसापूरे, विश्वासराव घावडे, गजानन उपलेंचावार, गजानन वैद्य, देवेंद्र जुमळे, देवानंद पोहेकर, विवेक गद्रे, राजेंद्र बारी, संजय पातुरकर, सुनील कोंबे, सुनील पवार यांच्यासह अनेकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# दोघांना पुण्यातून अटक



**विदर्भ केसरी। बुलढाणा,**

कोलवड (ता. बुलढाणा) येथील एका शेतकऱ्याला जिवे मारण्याच्या उद्देशाने मारहाण करून फरार झालेल्या दोन आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पुण्यातून अटक केली आहे. गुप्त माहिती, तांत्रिक विश्लेषण आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्याच्या आधारे ही कारवाई करण्यात आली.

बुलढाणा शहर पोलिस ठाण्यात दाखल गुन्हा क्रमांक ९/२०२६ मध्ये खुनाचा प्रयत्न, जाणीवपूर्वक गंभीर दुखापत करणे, धमकी देणे, मारहाण तसेच सामूहिक गुन्हेगारी कृत्य असे गंभीर आरोप नोंदविण्यात आले आहेत. या प्रकरणात कोलवड येथील शेतकरी व सामाजिक कार्यकर्ते नीलेश पाटील यांना वाहन बाजूला घ्या असे सांगितल्याच्या कारणावरून ६ जानेवारी रोजी मारहाण करण्यात आल्याची घटना घडली होती. या गुन्ह्यातील आरोपी सूरज मोतीराम पसरटे (वय २३, रा. विजयनगर, सुंदरखेड) आणि आदेश सुनील राठोड (वय २२, रा. क्रीडा संकुल रोड, आयटीआय कॉलनी, बुलढाणा) हे दोघे पुण्यात असल्याची खात्रीशीर माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार २० जानेवारी रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पुण्यातील वाघोली परिसरातून दोघांना ताब्यात घेतले. पुढील तपास पोलिस करीत आहेत.

# नेर नगराध्यक्षांसह नगरसेवकांचा सत्कार

### संताजी बहुउद्देशीय तेली समाज संस्थेचा नेर येथे उपक्रम

**विदर्भ केसरी।**




**नेर** : नगर परिषदेच्या नगराध्यक्ष व नगर सेवकांच्या निवडणुका संपन्न झाल्या असता एकूण १०नगर परिषदा व एक नगर पंचायतची निवडणूक पार पडली असता समाजाचे एकूण १५नगर सेवक व एक नगराध्यक्ष नेर येथील सौ. सुनीताताई पवनभाऊ जयस्वाल हया नगराध्यक्ष पदी विराजमान झाल्या. यवतमाळ जिल्हातील नेर नगर परिषदमध्ये २१ नगरसेविकांपैकी ८ नगर सेवक हे तेली समाजाचे शिंदे सेना व भाजपा या पक्षा व एक अपक्ष निवडून आले अशी महाराष्ट्र राज्यात एकमेव नगर परिषद असून ती तेली समाजा साठी भूषणावह बाब असून समाजाला त्याचा गर्व असून आज दिनांक २१/१/२६ला नेर येथे संताजी बहुउद्देशीय तेली समाज संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉक्टर मंगेशभाऊ रुईकर तर प्रमुख अतिथी डॉक्टर विलास काळे, ज्ञानेश्वर रायमल, अनिल जीपकाटे, भाऊराव ढवळे, आयोजक अमोल तंबाखे असून सत्कार मूर्ती (१)सौ. सुनीताताई पवन भाऊ जयस्वाल नगराध्यक्ष (२) सौ. शिवानीताई नी. गुगलिया उपाध्यक्षा (३)श्री पवनभाऊ जयस्वाल (४)श्री शालिकराव गुल्हाने (५)सौ. सोनालीताई सं. गुल्हाने (६)सौ. रिनाताई पं. गुल्हाने (७)प्रवीण भाऊ जयस्वाल (८) रुपेशभाऊ गुल्हाने या प्रमाणे नेर येथील नगर परिषद मध्ये राजकीय प्रगल्भता समाजाने दाखविल्याबद्दल सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे.

आजच्या सत्कार कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. गुल्हाने सर यांनी केले असून प्रमुख अतिथींनी आपले विचार मांडले असून कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता गणेशराव देऊळकर राजेंद्रजी देऊळकर अमोलभाऊ तंबाखे व नेर येथील समाज बांधवानी परिश्रम घेतले

# गावाचा कर द्या, मग वीज देयक पाठवा

**विदर्भ केसरी। वर्धा,**



ग्रामीण भागातील पथदिव्यांचा वीजपुरवठा खंडित करून गावे अंधारात ढकलण्याचा बडगा पुन्हा एकदा महावितरण कंपनीने उगारला आहे.

या विरोधात सरपंच संघटनेने आक्रमक पावित्रा घेत महावितरण कंपनीने गावातील इलेट्रॉनिक पोल, ट्रॉन्सफार्मर, कार्यालयाचा कर द्यावा त्यानंतरच पथदिव्यांचे बिल ग्रामपंचायत भरेल, अशी भूमिका घेतली आहे. पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांना निवेदन देऊन खंडित केलेल्या वीज पुरवठ्याची पूर्ण जोडणी करून द्यावी, तसेच पूर्वीप्रमाणे बिलाचा भरणा शासनाने करावा, अशी मागणी केली आहे.

ऑक्टोबर २०२१ मध्ये गावखेड्यातील ग्रामपंचायतींच्या हद्दीतील पथदिव्यांच्या बिलाचा भरणा हा यापुढे ग्रामपंचायतीने भरावा, असा फतवा काढण्यात आला होता. मात्र, या निर्णयाविरोधात सरपंच संघटनेने विरोध केला होता. या विरोधानंतर सरकारने नमते घेत पूर्वीप्रमाणे गावातील पथदिव्यांच्या बिलाचा भरणा शासनाच्या वतीने पंचायत समिती स्तरावरुन भरणार असल्याचा निर्णय घेतला होता. मात्र, आता शासनाकडून हात वर केल्याची प्रचिती पहावयास मिळत असून शासनाने बिलाचा भरणा न केल्याने ४ वर्षानंतर महावितरण कंपनीच्या वतीने पुन्हा एकदा गावे अंधारात ठेवण्याचा खेळ सुरू केला आहे.

जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात प्रशासक राज आहे. मोजयाच ग्रामपंचायतीमध्ये सरपंच असून आता पथदिव्यांच्या लाखो रुपयांचे बिल भरायचे कुठून, हा गंभीर प्रश्न प्रशासक व सरपंचासमोर निर्माण झाला आहे. शासनाने पाठ फिरवल्याने महावितरण कंपनीने पथदिव्याच्या बिलाचा भरणा न केल्याने पुन्हा एकदा जिल्ह्यातील गावे अंधारात जाण्याच्या मार्गावर असून अनेक गावांचा पथदिव्याचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला आहे. याकडे तातडीने शासन-प्रशासनाने लक्ष द्यावे, महावितरणने गावात बसविलेल्या इलेट्रीकल्स साहित्याचा आधी कर द्या मग वीज बिल पाठवावे, असे न झाल्यास सरपंच संघटना रस्त्यावर उतरून आंदोलन करेल, असा इशारा पालकमंत्री डॉ. भोयर यांना दिलेल्या निवेदनातून दिला आहे. निवेदन देतेवेळी जिल्हाध्यक्ष धर्मेंद्र राऊत, विलास नवघरे, राजू नौकरकर, मुरलीधर चौधरी, जगदीश वरटकर, सतीश ठाकरे, सरपंच राजेश लोणकर, अनंता हटवार, राजेश शिरगरे, दामिनी डेकाटे, किरण आंबुलकर, निलम जाधव, चित्रा पुजदेकर, मंजुषा माहुरे, शारदा तुमराम आदींची उपस्थिती होती.

# गोमास विक्रीचा पर्दाफाश, पाच आरोपीवर गुन्हे दाखल

**विदर्भ केसरी। उमरखेड :**


शहरातील ताजपुरा वार्ड येथे गोवंश जातीच्या जनावराची कत्तल करुन गोमांस विक्री केली जात होती. याबाबतची गोपनीय माहिती उमरखेड पोलिसांना मिळाली होती. त्यावरून पोलिसांनी कारवाई करत मुद्देमालासह ५ जणांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले.

शकील हमद मोहम्मद युसुफ (५७) रा डॉ. आंबेडकर वार्ड, अतिक अहमद मो. ईस्माईल (४०) रा. रहीम नगर, शेख मुनाफ शेख बाबू (५२) रा. डॉ. आंबेडकर वार्ड, अब्दुल करीम मो. युनुस (२९) रा. ताजपुरा वार्ड, शेख मुसा शेख ईसा (४२) रा. रहीम नगर अशी आरोपींची नावे आहेत. पोलिस उपनिरीक्षक गणेश मुंढे, सागर इंगळे, सुदर्शन वानोळे, संदीप जाधव व आरसीपी पथक यांना ताजुपरा मस्जीदच्या बाजूला एका बंदीस्त जागेमध्ये मासाची विकी करीत असताना आरोपी मिळून आले. आरोपीकडून मास, वजन काटे व ५ सुरी असा एकूण ३१५० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. आरोपीविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अप्पर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी हर्षवर्धन बि.जे, पोलिस निरीक्षक शंकर पांचाळ, गणेश मुंढे, सागर इंगळे, सुदर्शन वानोळे, प्रकाश बोंबले, संदीप जाधव व आरसीपी पथक यांनी पार पाडली. अधिक तपास पोलिस हवालदार प्रकाश बोंबले करीत आहेत.

# पोलिसांकडून झालेल्या अमानुष मारहाणीची चौकशी करून दोषींवर कारवाई करा

**विदर्भ केसरी। चामोर्शी,**



दुसऱ्याच्या सांगण्यावरून मांजा विक्रीचा संशय घेत पोलिस उपनिरीक्षक राजू वाघमारे व पोलिस कर्मचारी सुदर्शन कुत्तरमारे हे माझ्या घरी येऊन घराची झडती घेतली असता घरात काहीही मिळाले नसतांना नाहक माझ्या विशाल नामक मुलाला पोलिस स्टेशनला नेऊन गुन्हा कबूल कर म्हणून अमानुष मारहाण केली. त्यात तो गंभीर जखमी झाला असून या गंभीर प्रकरणी सखोल चौकशी करून त्यांना निलंबित करावे, अशी मागणी पत्रकार परिषदेत ज्योती अनिल येणुगवार या निराधार महिलेसह इतर नातेवाईकांनी केली आहे 21 जानेवारी रोजी घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ज्योती येणुगवार, दीपक येणुगवार, राजू येणुगवार, अक्षय येणुगवार, सोपान नैताम, महेश पिंपरे गणेश गव्हारे, प्रवीण सातपुते, तुषार वैरागडे, अमोल उंदीरवाडे, नीरज पिंपरे, वासिम पठण, मुकेश गड्डमवार, निलेश नैताम आदी उपस्थित होते.

यावेळी ज्योती येणुगवार यांनी सांगितले की, माझे पती बऱ्याच वर्षापूर्वी मरण पावले. मी निराधार असून कुटुंबाचा अत्यंत हलाखीच्या परिस्थित उदरनिर्वाह करत आहोत, आमचा कोणताही व्यवसाय, दुकान नसतांना 15 जानेवारी रोजी रात्री 9 वाजता माझ्या घरी येथील पोलिस स्टेशनमध्ये कार्यरत पोलिस उपनिरीक्षक राजू वाघमारे व पोलिस कर्मचारी सुदर्शन कुत्तरमारे यांनी मांजा चौकशीच्या नावाखाली माझ्या घराची झडती घेतली. मात्र घरात काही मिळाले नाही म्हणून वापस गेले. त्यानंतर एक तासाने पोलिस कर्मचारी सुदर्शन कुत्तरमारे हे माझा मुलगा विशाल अनिल येनुगवार (21) याला पोलिस स्टेशनमध्ये चौकशीसाठी घेऊन गेले. दरम्यान मी, माझी मुलगी, घरशेजारी पोलिस ठाण्याच्या गेलो तेव्हा माझ्या मुलाला गुन्हा कबूल कर म्हणून बेदम अमानुषपणे मारहाण केली. त्यामुळे त्याच्या कानाला व हाताला गंभीर दुखापत झाली व त्याच्या एका कानाला ऐकु येत नसून माझी मुलगी सुध्दा माझ्या भावाला मारू नका म्हणून विनवणी केली असता तिला सुध्दा ढकलढोब केल्याचा आरोपही केला. त्यानंतर घराशेजारील लोकांनी विनवणी केली असता रात्री दोन वाजता विशालला सोडण्यात आले. त्याला गडचिरोली जिल्ह्य सामान्य रुग्णालयात दाखल करून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहे, असे सांगितले.

पोलिस उपनिरीक्षक राजू वाघमारे व पोलिस कर्मचारी सुदर्शन कुत्तरमारे यांनी आपल्या अधिकारांचा गैरवापर करून माझ्या मुलाला मारहाण केली. पोलिसांनी कायद्याच्या चौकटीत राहून काम करणे अपेक्षित असताना अशा प्रकारची बेकायदेशीर वर्तणूक लोकशाही व्यवस्थेस काळीमा फासणारी असल्याचे सांगत ज्योती येणुगवारसह इतरांनी 20 जानेवारी राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल, पोलिस अधीक्षक निलोत्पल, उपविभागीय पोलिस अधिकारी जगताप, आमदार डॉ मिलींद नरोटे यांची भेट घेत निवेदन दिले. पीडीत व्यक्तीस न्याय व योग्य संरक्षण द्यावे, अन्यथा उपोषण करणार, असा इशारा पत्रकार परिषदेतून देण्यात आला.

संबंधित प्रकरणाची निवेदनाद्वारे वरिष्ठ स्तरावरून दखल घेण्यात आलेली असून, चौकशीअंती निष्पन्न झाल्यास संबंधितांवर कारवाई केली जाईल, असे चामोर्शी पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक दीपक डोब यांनी सांगितले.

दैनिक विदर्भ केसरी RNI MAHMAR/2022/88796 हे वृत्तपत्र प्रकाशक अमोल नरेश कंटाळे यांच्याव्दारे दैनिक विदर्भ केसरी कार्यालय शमीम आझाद शाळा दर्यापूर. जि. अमरावती कार्यालय, येथून मालक अमोल नरेश कंटाळे यांच्या वतीने प्रकाशित केलेले असून संपादक अमोल कंटाळे यांनी संपादीत केलेले आहे. आणि मुद्रक साई दर्पण प्रकाशन यांनी सिव्हिल लाइन दर्यापूर ता. दर्यापूर जिल्हा अमरावती पिन 444803 येथे मुद्रीत केलेले आहे. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहीरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीशः संपर्क साधुन खात्री करुन पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास दर्यापूर न्यायालया अंतर्गत)

Printed by-Amol Naresh kantale (printer name) and published by- Amol Naresh kantale (Owner name) and printed at-SAI DARPAN PRAKASHAN civil line, Daryapur Tq-Daryapur dist, Amravati Maharashtra 444803 (name & complete address of printing press)and published at-shamim Azad school Rajputpura, Daryapur, dist, Amravati, Maharashtara-444803 complete place of publication-Editor-Amol Naresh Kantale(Editor name ) tital code. MAHMAR51049 l, Email:-vidarbhkesari21@gmail.com Mob-9975532291,9096945629

दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू







!! मना-मनात दारा-दारात फक्त विदर्भ केसरी!!

## प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट विकास पालकमंत्र्यांच्या हस्ते आज शेती साहित्याचे वाटप

■ यवतमाळ, दि. २२ : प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट विकास घटकांतर्गत वैयक्तिक शेतकरी लाभार्थ्यांना शेती साहित्य वाटपाचा कार्यक्रम राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांच्या हस्ते उद्या दि 23 जानेवारी रोजी बळीराजा चेतनाभवन येथे सकाळी 10. 30 वा. होणार आहे. पाणलोट विकास घटकांतर्गत उत्पादन पद्धती घटकाच्या माध्यमातून वैयक्तिक शेतकरी लाभार्थ्यांना आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्यात येत आहे. कृषी विकासाला गती देणारा हा उपक्रम आहे, अशी माहिती जिल्हा जलसंधारण अधिकारी यांनी दिली.

**महत्त्वाचे**



## गरजू विद्यार्थ्यांना अनामी फाउंडेशन तर्फे शैक्षणिक साहित्याचे वितरण

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ :प्रतिनिधी**

या वर्षीच्या चालू शैक्षणिक सत्रात शिक्षणाच्या मुख्य प्रवाहापासून वंचित,गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणून त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा या उदात्त हेतूने अनामी फाउंडेशन तर्फे जिल्यातील खरद,कारेगाव यावली,वडगाव, धानोरा,भारी पोड येथील सर्व जिल्हा परिषद शाळांमधिल शेकडो विद्यार्थांना शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. शैक्षणिक साहित्यामध्ये संपूर्ण शालेय सामुग्रीचा प्रामुख्याने समावेश होता.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती व महापरिनिर्वाण दिनानिमित्त सातत्याने राबविण्यात येत असलेल्या "एक वही एक पेन" उपक्रमाचा फार मोठा हातभार लागत असल्याचे फाउंडेशनचे प्रवक्ता सिद्धार्थ भवरे यांनी यावेळी नमूद केले तसेच त्यांनी उपस्थित विद्यार्थांना महापुरुषांचा त्याग,समर्पण व शिक्षणाचे महत्व याविषयी मार्गदर्शन केले.अनामी फाउंडेशनचे उपाध्यक्ष इंजि.दीपक नगराळे यांनी फाउंडेशनचा उद्देश व राबविण्यात आलेल्या उपक्रमांविषयी माहिती दिली.याप्रसंगी अनामी फाउंडेशनचे बळीराम अडागळे,विलास वानखडे, ॲड.सचिन आठवले,मंगेश चव्हाण,प्रफुल शंभरकर,आनंद देवगडे,शंतनु देशभ्रतार,अजय शेंडे,आशिष खडसे यांच्यासह शाळेचे मुख्याध्यापक,शिक्षकवृंद प्रतिष्ठित गावकरी व मोठ्या संख्येने शालेय विद्यार्थी उपस्थित होते.

## राष्ट्रवादी युवक काँग्रेस दारव्हा तालुकाध्यक्षपदी रणजित झोंबाडे यांची निवड

**▸विदर्भ केसरी। प्रतिनिधी / दारव्हा**



दारव्हा तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची संघटनात्मक बांधणी व फेरबदल करण्यात येत असून, त्यानुसार माहूली येथील सामाजिक कार्यकर्ते रणजित झोंबाडे यांची राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या दारव्हा तालुकाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. प्रदेश उपाध्यक्ष वसंत घुईखेडकर यांच्या नेतृत्वाखाली, प्रदेश सरचिटणीस विराज घुईखेडकर यांच्या मार्गदर्शनात तसेच जिल्हाध्यक्ष योगेश धानोरकर व राष्ट्रवादी काँग्रेस तालुकाध्यक्ष प्रा. चरण पवार यांच्या हस्ते ही नियुक्ती करण्यात आली. नियुक्तीनंतर रणजित झोंबाडे यांनी सर्वसामान्य युवकांच्या समस्या व अडीअडचणी सोडविण्यासाठी राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या माध्यमातून कार्य करण्याचा संकल्प व्यक्त केला. यावेळी ईश्वर राठोड, अशोक जोगदंड, विशाल चव्हाण, विनोद जाधव यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## बंद घराचे कुलूप तोडून ५५ हजारांची चोरी

वडकी: वडकी (ता. राळेगाव) येथील वार्ड क्रमांक ३ मध्ये घरफोडीची घटना घडली आहे. फिर्यादी सौ. उषा अरुण भोरे यांचे घर १६/०१/२६ ते २१/०१/२६ दरम्यान बंद असताना अज्ञात आरोपीने घराचे कुलूप आणि कोंडा तोडून आत प्रवेश केला. चोरट्याने घरातील कपाट फोडून, त्यातील दोन्ही ड्रॉवरमध्ये ठेवलेला एकूण ५५,००० रुपयांचा मुद्देमाल लंपास केला.

# आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर

### उघड्यावर जाळला जातो कचरा : वंचित बहुजन आघाडीची नगराध्यक्षांकडे कारवाईची मागणी

**▸विदर्भ केसरी। विजय निखाते**



**पुसद :** पुसद नगरपरिषदेच्या माध्यमातून शहरातील ओला व सुका कचरा इंदिरानगर (ता. पुसद) ग्रामपंचायत हद्दीत असलेल्या डम्पिंग यार्डमध्ये खुलेआम टाकून जाळला जात असल्याचा गंभीर आरोप वंचित बहुजन आघाडीने केला आहे. या संदर्भात वंचित बहुजन आघाडीच्या वतीने नगरपरिषद पुसदचे नगराध्यक्ष यांना लेखी तक्रार देण्यात आली आहे.

वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा संघटक बुद्धरत्न भालेराव, तालुका अध्यक्ष संदीप आढाव आणि तालुका महासचिव जयानंद उबाळे यांनी प्रत्यक्ष डम्पिंग यार्डची पाहणी केली असता, तेथे कोणतीही वैज्ञानिक प्रक्रिया न करता कचरा जाळला जात असल्याचे स्पष्टपणे दिसून आले. डम्पिंग यार्ड हे वस्तीला लागून असल्याने निर्माण होणारा दाट धूर थेट रस्त्यावर व नागरिकांच्या घरांमध्ये जात असून आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. पाहणीदरम्यान ओला व सुका कचरा वेगळा न करता टाकलेला आढळून आला. तसेच कचरा प्रक्रिया करणारी यंत्रणा बंद असून डम्पिंग यार्डवर वजनकाटा, इन्चार्ज अधिकारी व चौकीदार नसल्याचेही निदर्शनास आले. विशेष म्हणजे कचऱ्याच्या ढिगाऱ्यात मृत प्राणी आढळून आल्याने त्यांना कचऱ्यासोबत जाळले जाण्याचा संशयही व्यक्त करण्यात आला आहे.

या गंभीर प्रकाराबाबत नगराध्यक्षांनी तात्काळ लक्ष घालून कचरा जाळणी बंद करावी, कचरा व्यवस्थापनासाठी वैज्ञानिक पद्धती लागू कराव्यात व संबंधित कंत्राटदार व जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने करण्यात आली आहे.

**अन्यथा तीव्र आंदोलन**

■ **तसेच या संपूर्ण प्रकरणातील पुढील सर्व निर्णय व कार्यवाही करताना वंचित बहुजन आघाडीला विश्वासात घेऊनच कारवाई करण्यात यावी, अन्यथा लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.**

## प्रभाग क्रमांक 4 मधील शाळांना स्व. गोपीनाथजी मुंडे यांचे नाव द्या

### नगर सेवक पिंटु बांगर यांची नगराध्यक्षांकडे मागणी

**▸विदर्भ केसरी। प्रतिनिधी**
**यवतमाळ, दि. २२ जानेवारी**



यवतमाळ नगर परिषदेअंतर्गत प्रभाग क्रमांक ४ येथील शाळा क्रमांक ४ व शाळा क्रमांक ९ यांना लोकनेते, दिवंगत माजी केंद्रीय मंत्री स्व. गोपीनाथजी मुंडे यांचे नाव देण्यात यावे अशी मागणी नवनियुक्त नगर सेवक पिंटु बांगर यांनी नगराध्यक्ष प्रियदर्शनी उईके यांचेकडे निवेदनाव्दारे केली आहे. वंजारी समाजाकडून होत असलेल्या मागणीच्या अनुषंगाने त्यांनी नगराध्यक्षांचे सदर मागणीकडे लक्ष वेधले आहे.

शिवसेनेचे नगरसेवक नितीन बांगर यांनी नगराध्यक्षांना दिलेल्या निवेदनात, महाराष्ट्राच्या राजकारणात वंजारी समाजाच्या संघटनासाठी तसेच सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी स्व. गोपीनाथजी मुंडे यांनी केलेले कार्य अतुलनीय असल्याचे नमूद केले आहे. स्व. मुंडे हे वंजारी समाजाचे आराध्य दैवत मानले जात असून, त्यांच्या नावाने शाळांना नामकरण केल्यास समाजात प्रेरणा निर्माण होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. या प्रस्तावावर नगर परिषदेच्या येणाऱ्या सर्वसाधारण सभेत चर्चा करून मंजुरी द्यावी, अशी विनंती निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

शाळांना लोकनेत्याचे नाव मिळाल्यास विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, नेतृत्वगुण आणि प्रेरणादायी विचार रुजतील, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या मागणीमुळे शहरातील वंजारी समाजासह विविध सामाजिक संघटनांकडून सकारात्मक प्रतिक्रिया उमटत असून, आता नगर परिषदेच्या निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## हॉटेल जसराज ओबेराय (रेडिसन ब्ल्यू) मध्ये भरली मायेची थाळी

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**



यवतमाळ जिल्ह्यातील बालगृह यवतमाळ, वणी व पुसद येथील अनाथ, वंचित व निराश्रित बालके काही कार्यक्रमानिमित्त यवतमाळ येथे आली असताना त्यांच्यासाठी एक अविस्मरणीय क्षण अनुभवायला मिळाला. यवतमाळ बालकल्याण समितीच्या पुढाकाराने या बालकांना शहरातील नामांकित हॉटेल जसराज ओबेराय (रेडिसन ब्ल्यू) येथे स्नेहभोजनासाठी नेण्यात आले.

या स्नेहभोजनावेळी बालकांच्या चेहऱ्यावरचा आनंद शब्दात व्यक्त न करता येण्यासारखा होता. आयुष्यात पहिल्यांदाच इतक्या भव्य व आलिशान हॉटेलमध्ये येण्याचा अनुभव मिळाल्याने मुले व मुली अत्यंत उत्साही व आनंदित दिसून येत होती. हॉटेलच्या सजावटीपासून ते आदरयुक्त सेवाभावापर्यंत प्रत्येक गोष्ट बालकांसाठी नवी व सुखावणारी ठरली. संपूर्ण हॉटेलची पाहणी करताना तसेच विविध चविष्ट पदार्थांचा मनसोक्त आस्वाद घेताना बालकांचा आनंद गगनात मावेनासा झाला होता. "आयुष्यात पहिल्यांदा असे काही अनुभवायला मिळाले," अशा भावनिक प्रतिक्रिया बालकांनी यावेळी व्यक्त केल्या. या उपक्रमामुळे केवळ जेवणच नव्हे, तर मायेची, आपुलकीची आणि समाजाकडून मिळणाऱ्या प्रेमाची अनुभूती बालकांना मिळाली. यवतमाळ बालकल्याण समितीच्या या स्तुत्य उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, अशा उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक संदेश पोहोचत असल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे.

## सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियान तपासणी शिबीर..!

**▸विदर्भ केसरी। पुसद प्रतिनिधी**



काळी दौ : महागाव तालुक्यातील मोठी बाजारपेठ असलेल्या काळी दौलत खान येथिल ग्रामपंचायत कार्यालयामध्ये सिकलसेल आणि अनिमिया विशेष अभियानांतर्गत महिला तपासणी निदान व उपचार या शिबिराचे आयोजन प्राथमिक आरोग्य केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले, यात असंख्य महिलांनी तपासणी व औषध उपचार करून घेतले. महागाव तालुक्यातील काळी दौ. खान ग्रामपंचायत अंतर्गत सिकलसेल आणि अमिनिया या विशेष अभियाना अंतर्गत महिला तपासणी औषध उपचार या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, हे विशेष, या शिबिराच्या अध्यक्षस्थानी या काळी दौलत खान ग्रामपंचायतीच्या सरपंचा निशाताई संतोष राठोड या उपस्थित होत्या. पाहूजाता ग्रामीण विभागाच्या महिला कामाच्या ताणतणावामुळे स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करत असल्यामुळे महिलांना विविध आजाराला सामोरे जावे लागत आहे, अशा आजारावर वेळीच उपचार व निदान झाले नाही तर काही वेळेला जीवही गमावण्याची पाळी येते. त्यातही रोग होण्याच्या आधी योग्यती तपासणी करून उपचार करण्यात आले तर महिलांचे जीव वाचू शकते, असे उद्धगार या काळी दौलत खान ग्रामपंचायतीच्या सरपंचा निशाताई राठोड यांनी या विशेष तपासणी शिबिरा प्रसंगी काढले. या महिलांच्या विशेष तपासणी वेळी काळी दौलत खान ग्रामपंचायतचे सचिव श्री विनोद चव्हाण तसेच उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्य यासह शिवसेना शिंदे गटाचे तालुका प्रमुख संतोष राठोड तसेच प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी आरोग्य सेवक आरोग्य सेविका व आरोग्य कर्मचारी तसेच काळी दौलत खान ग्रामपंचायतचे कर्मचारी उपस्थित होते. या शिबिरामध्ये शेकडोच्या संख्येने महिलांनी तपासणी करुन घेऊन रोगाचे निदान करुन घेतल्या, विशेष बाब म्हणजे या शिबिराचे विशेष देखभाल काळी दौलत खानच्या ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. हेही तेवढेच खरे..!

## सन २०२६ च्या शासकीय जयंती सूचीमध्ये संत तुकाराम महाराज यांच्या जयंतीचा समावेश करण्याची मागणी

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**



महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने दिनांक २९ डिसेंबर २०२५ रोजी जारी केलेल्या शासन परिपत्रकानुसार सन २०२६ साठी राष्ट्रपुरुष व थोर व्यक्तींच्या जयंतींची अधिकृत शासकीय यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. मात्र, या यादीमध्ये महाराष्ट्राचे आराध्य दैवत, वारकरी संप्रदायाचा कळस आणि छत्रपती शिवाजी महाराज यांचे आध्यात्मिक गुरु असलेल्या जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या जयंतीचा (तुकाराम बीज) समावेश करण्यात आलेला नसल्याने राज्यभरातून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. या संदर्भात यवतमाळ जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर करण्यात आले असून, ही गंभीर चूक तातडीने दुरुस्त करण्याची मागणी करण्यात आली आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, संत तुकाराम महाराज यांनी आपल्या अभंगवाणीच्या माध्यमातून समाजप्रबोधन करत समता, बंधुता आणि मानवतेचा संदेश दिला. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, सामाजिक व वैचारिक जडणघडणीत त्यांचे योगदान अनन्यसाधारण असून, त्यांचे स्थान अत्यंत मोलाचे आहे.

प्रतिवर्षी संपूर्ण महाराष्ट्रात तुकाराम बीज अत्यंत श्रद्धा व भक्तिभावाने साजरी केली जाते. मात्र शासकीय यादीतून या जयंतीचा उल्लेख वगळण्यात आल्यामुळे लाखो वारकरी भक्त तसेच शिवप्रेमींच्या भावना दुखावल्या गेल्याचे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. याशिवाय, इतर अनेक संतांच्या जयंतींचा शासकीय सूचीमध्ये समावेश असताना, वारकरी संप्रदायाच्या प्रमुख आधारस्तंभाचे नाव वगळले जाणे ही गंभीर प्रशासकीय विसंगती असल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

या परिपत्रकामुळे राज्यातील शाळा, महाविद्यालये व शासकीय कार्यालयांमध्ये संत तुकाराम महाराज यांची जयंती अधिकृतरीत्या साजरी करण्यात अडथळे निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे प्रशासनाने या प्रकरणाची तातडीने दखल घ्यावी, आपल्या स्तरावरून राज्य शासन व संबंधित विभागाकडे अहवाल सादर करावा तसेच संत तुकाराम महाराज यांच्या जयंतीचा समावेश असलेले शुद्धीपत्रक लवकरात लवकर निर्गमित करण्यासाठी पाठपुरावा करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

■ **ही मागणी पूर्ण न झाल्यास वारकरी संप्रदाय व संत तुकाराम महाराजांचे अनुयायी लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यास बाध्य होतील, असा इशाराही निवेदनात देण्यात आला आहे.**
**सदर मागणी विनोद दौंदल, जिल्हा सचिव - अखिल कुणबी महासंघ यांच्या वतीने करण्यात आली आहे.**

## शासकीय मानधन लाभधारक वृध्द कलावंतांची सभा

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**

राष्ट्रसंत तूकडोजी महाराज कलावंत वारकरी सेवा विकास व सन्मान संस्था महाराष्ट्र राज्य ह्या संस्थेतर्फे जिल्ह्यातील शासकीय मानधन लाभधारक वृध्द कलावंतांची सभा दिनांक 27 जानेवारी 2026 रोजी ,मानवता मंदीर आर्णी रोड यवतमाळ येथे दू.12:00 वाजता आयोजीत करण्यात आली आहे.;

केंद्र शासनाच्या सांस्कृतिक विभागाकडून मिळणा-या मानधना साठीच्या प्रस्तावाबाबत त्यांना सभेत मार्गदर्शन करण्यात येणार आहे ,आणि त्यासाठी आवश्यक असणारे शासन मान्यता प्राप्त कलावंत समितीचे प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात येणार आहे. ज्या वृध्द कलावंतांचे मानधन चालू असतांना निधन झाले,त्यांचे वारसाला मिळावयाचे मानधन कायदेशीर वारसाचा कोर्टाचा आदेश सादर केला गेला नसल्याने रखडलेले आहे, मानधन मंजूरातीच्या निवड यादीमधे नाव असूनही मानधन खात्यामधे जमा झाले नाही, किरकोळ स्वरूपाच्या तांत्रीक कारणाने मानधन खोळंबून पडले आहे.अशा सर्व महत्वपूर्ण प्रश्नावर चर्चा, आणि तात्काळ कार्यवाही करण्याबाबत मार्गदर्शन होणारआहे,तसेच दूर्घटना,अपघात तथा दूर्धर आजाराने मय्यत किंवा विकलांग झालेल्या वृध्द कलावंतांना किमान दहा लाखाचा विमा शासनाकडून मिळावा, शासकीय मानधन मंजूर झालेल्या सर्व वृध्द कलावंतांचा दरवर्षी शासनातर्फे सन्मान राशी देवून सत्कार करावा, कलावंत मानधनात वाढ करून दहा हजार रूपये करावे,वृध्द कलावंतांना एस. टी. प्रवास मोफत करावा ,वृध्द कलावंतांना बिनव्याजी कर्ज ऊपलब्ध करून द्यावे ,ई.न्याय्य मागण्यावर सूध्दा विचार विनीमय करून शासनाकडे मा.जिल्हाधिकारी मार्फत निवेदन सादर करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील सर्व शासकीय मानधन लाभधारक वृध्द कलावंतांनी ह्या सभेला मोठ्या संख्येनी ऊपस्थित राहण्याचे आवाहन कलावंत समितीचे संस्थापक अध्यक्ष ॲड.श्याम खंडारे,ऊपाध्यक्ष सिध्दार्थ भवरे,महासचीव गंगाधरजी घोटेकर,जिल्हाध्यक्ष पूर्व राजेश मडावी,जिल्हाध्यक्ष पश्चिम गणेशराव धर्माळे,.ई पदाधिका-यांनी केले आहे.

## ग्रामपंचायत देवगाव येथे स्वच्छता अभियानांतर्गत दप्तर तपासणी व गाव पाहणी

**▸विदर्भ केसरी। परतवाडा**

स्वच्छ, सुंदर व आरोग्यदायी गाव ही संकल्पना प्रत्यक्षात उतरविण्यासाठी शासनाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धा अंतर्गत आज दिनांक १२ जानेवारी २०२६ रोजी ग्रामपंचायत देवगाव (ता. अचलपूर, जि. अमरावती) येथे अधिकृत पथकाकडून दप्तर तपासणी व प्रत्यक्ष गाव पाहणी करण्यात आली.



या अभियानाच्या अनुषंगाने ग्रामपंचायतीने केलेल्या कामकाजाची सखोल तपासणी करण्यासाठी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ग्रामपंचायत कार्यालयात भेट देऊन विविध दप्तरे, नोंदी व अहवालांची तपासणी केली. यामध्ये स्वच्छता विषयक रजिस्टर, घनकचरा व्यवस्थापन नोंदी, सांडपाणी व्यवस्थापन अहवाल, पाणीपुरवठा व पाणी गुणवत्ता तपासणी अहवाल, शौचालय वापराची माहिती, वृक्षलागवड नोंदी तसेच जनजागृती उपक्रमांचे दस्तऐवजीकरण यांचा समावेश होता. दप्तर तपासणीनंतर अधिकाऱ्यांनी संपूर्ण गावात प्रत्यक्ष फेरफटका मारून गावाची पाहणी केली. यावेळी गावातील अंतर्गत रस्ते, सार्वजनिक ठिकाणे, स्मशानभूमी, सार्वजनिक शौचालये, नाल्या, कचरा संकलन व्यवस्था तसेच घरगुती पातळीवरील स्वच्छतेची स्थिती पाहण्यात आली. यासोबतच गावातील जिल्हा परिषद शाळा व अंगणवाडी केंद्रांचीही सखोल पाहणी करण्यात आली. गावातील शाळा परिसर स्वच्छ, सुंदर व नीटनेटका ठेवण्यात आल्याचे पाहणीदरम्यान दिसून आले. शाळेतील वर्गखोल्या, स्वच्छतागृहे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, हात धुण्याची सुविधा तसेच परिसरातील स्वच्छता समाधानकारक असल्याचे अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आले. विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेबाबत जागृती निर्माण व्हावी यासाठी शाळेच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्यात येत असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले. तसेच गावातील अंगणवाडी केंद्रांची पाहणी करताना अंगणवाडी परिसराची स्वच्छता, मुलांसाठी उपलब्ध सुविधा, स्वच्छ पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह, कचरा व्यवस्थापन तसेच पोषण आहार वितरणाची माहिती घेण्यात आली. लहान बालकांच्या आरोग्याच्या दृष्टीने अंगणवाडी परिसर स्वच्छ व सुरक्षित ठेवण्यावर विशेष भर दिला जात असल्याचे यावेळी स्पष्ट झाले. गावामध्ये ओला व सुका कचरा वेगळा संकलन करणे, नियमित कचरा उचल, सांडपाण्याची योग्य निचरा व्यवस्था, उघड्यावर शौचमुक्त गाव ही स्थिती कायम राखणे, स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, सार्वजनिक ठिकाणी तसेच शैक्षणिक व बालविकास केंद्रांमध्ये स्वच्छता राखणे यावर विशेष लक्ष दिले जात असल्याचे पाहणीदरम्यान निदर्शनास आले. या अभियानात देवगाव ग्रामपंचायत, सरपंच, ग्रामसेवक, ग्रामपंचायत सदस्य, स्वच्छता कर्मचारी, शाळेतील शिक्षकवृंद, अंगणवाडी सेविका व मदतनीस, महिला बचत गट, युवक मंडळे तसेच सर्व ग्रामस्थांनी सक्रिय सहभाग घेतलेला आहे. "माझे गाव – स्वच्छ गाव" ही भावना गावकऱ्यांमध्ये रुजलेली दिसून आली. अधिकाऱ्यांनी यावेळी ग्रामपंचायतीने केलेल्या एकूणच स्वच्छता कामकाजाबद्दल समाधान व्यक्त करत काही सूचना व मार्गदर्शन केले. आगामी काळात स्वच्छतेचा दर्जा आणखी उंचावण्यासाठी, शाळा व अंगणवाडी परिसर अधिक आदर्श स्वरूपात विकसित करण्यासाठी तसेच स्पर्धेत अधिक गुण मिळवण्यासाठी या सूचनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे आवाहन करण्यात आले. शासनाच्या या महत्त्वपूर्ण अभियानाच्या माध्यमातून गावांचा सर्वांगीण विकास, नागरिकांचे आरोग्य सुधारणा तसेच बालक व विद्यार्थ्यांसाठी स्वच्छ व सुरक्षित वातावरण निर्माण करण्याचा उद्देश साध्य होत असून, देवगाव ग्रामपंचायत त्या दिशेने सातत्याने प्रयत्नशील आहे. भविष्यातही स्वच्छ, सुंदर व आदर्श गाव घडविण्यासाठी ग्रामपंचायत व ग्रामस्थ एकत्रितपणे कार्य करतील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## चंद्रपुरात पाचव्यांदा होणार महिला महापौर!



चंद्रपूर, चंद्रपूर महानगरपालिकेची स्थापना 2011 मध्ये झाली. पहिली सार्वत्रिक निवडणूक 2012 ला घेतली गेली. या संपूर्ण कालावधीत झालेल्या चारही महापौर या महिलाच होत्या. योगायोगाने यंदाच्या निवडणुकीनंतरही चंद्रपूरचे आरक्षण हे महिला ओबीसी निघाल्याने पाचव्यांदा या महानगरावर महिलाराज असेल, हे नक्की.

**महत्त्वाचे**

## तालुका मुख्याध्यापक संघाच्या वतीने नवनिर्वाचित नगराध्यक्ष यांचा सत्कार

**▸विदर्भ केसरी। मुर्तिजापूर प्रतिनिधी**



अखिल भारतीय मराठा महासंघ व मुर्तिजापूर तालुका मुख्याध्यापक संघाच्या वतीने अखिल भारतीय मराठा महासंघाचे तालुकाध्यक्ष व मुर्तिजापूर तालुका मुख्याध्यापक संघाचे तालुकाध्यक्ष श्री अरविंद कोकाटे व सचिव श्री देवानंद मुसळे यांनी नवनिर्वाचित नगराध्यक्ष मा.हर्षलभाऊ साबळे यांचा शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला या प्रसंगी नगराध्यक्ष मा.श्री हर्षलभाऊ साबळे यांनी सांगितले की शहराच्या विकासासाठी आवश्यक ते कार्य करीत राहिल या प्रसंगी अखिल भारतीय मराठा महासंघाचे तालुकाध्यक्ष व मुख्याध्यापक संघाचे तालुकाध्यक्ष श्री अरविंद कोकाटे व सचिव श्री देवानंद मुसळे मार्गदर्शक श्री मुन्नाभाऊ नाईकनवरे तालुका उपाध्यक्ष श्री हरीभाऊ वानखडे कार्याध्यक्ष श्री मनोज तायडे संघटक श्री दिपक बनारसे माजी मुख्याध्यापक श्री रणजीत इंगोले माजी मुख्याध्यापक श्री साबळे मुख्याध्यापक श्री राऊत मुख्याध्यापक श्री बेलामकर सर बंटी तिडके संपर्क प्रमुख आशिष कोकाटे राजू काळे या प्रसंगी अखिल भारतीय मराठा महासंघाचे पदाधिकारी व मुख्याध्यापक संघाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते



## आझाद हिंद केसरी शंकरपटात धावल्या ४७८ बैलजोड्या

**▸विदर्भ केसरी। शिरसगाव कसबा // प्रतिनिधी:-अक्षय गुर्जर**

बहीरम यात्रेतील बहूचर्चीत हिंद केसरी शंकरपटाचा अंतीम दिवस अतीशय उत्साह व प्रचंड गर्दीत रोमांचकारी वातावरणात पार पडला.या वर्षीच्या शंकरपटात आजपर्यंतचा सर्वच बाबतीत उच्चांक गाठणारा रोमहर्षक अनुभवाने हा शंकरपट पार पडला. सर्वच विक्रम मोडणारा ह्या शंकरपटामधे ४७८ बैलगाड्यांनी सहभाग घेऊन उच्चांक गाठला.पटाचे आयोजक आमदार प्रविण तायडे यांच्या प्रयत्नाने संपन्न झालेल्या या शंकरपटातील विजयी बैलजोडी मालक व त्यांच्या धुरकर्यांना जाहीर केल्यानुसार बक्षिस वितरण करण्यात आले.जनरल गटातील प्रथम क्रमांक राज विनोद दमये,वऱ्हा, ता.तिवसा यांच्या जोडीला मिळाला.दुसरा क्रमांक नीतु तीवारी,यवतमाळ यांना होंडा युनीकार्न तर तृतीय क्रमांक मिशु अन्विका राठोड यांना ८१ हजार रुपयाचे रोख बक्षिस देण्यात आले. तर ब गटातील विजेत्यांना ओंकार खोंडकर,आंबेवाडी यांना प्रथम क्रमांकाचे हीरो होंडा डीलक्स तर द्वितीय क्रमांकाचे आतिशसेठ वर्मा,वाशिम यांना ५१ हजाराचे व तृतीय क्रमांक विशाल राजपुत, कपातवाडी यांना ३५ हजाराचे रोख बक्षिस मान्यवर पाहुण्यांचे हस्ते देण्यात आले. याप्रसंगी आमदार प्रविण तायडे यांनी उपस्थित बैलगाडी मालक व त्यांचे धुरकरी यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.या पारीतोषिक वितरणाच्या कार्यक्रमाला भाजपाचे गजानन कोल्हे, प्रविण तोंडगावकर, शंकर मालठाने, रमेशभाऊ मडघे , रूपेश ढेपे ,रीतेश नवल,अतुल वाट,बाळासाहेब सोनार, मुरली माकोडे,कुंदन यादव,रमेश तायवाडे,हर्शल धुळे व भाजपा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जुन्या वादातून फरशीच्या तुकड्याने डोक्यावर प्रहार

**▸विदर्भ केसरी। मुकुटबन:**

मुकुटबन पोलीस स्टेशन अंतर्गत घोन्सा येथे जुन्या वादातून हाणामारी झाल्याची घटना घडली आहे. फिर्यादी मधुकर नानाजी आगूलवार (५४ वर्षे) यांची आरोपी प्रदीप मुकुंदा बोर्ड याने कॉलर पकडून त्यांना जमिनीवर पाडले आणि हाताने मारहाण केली. त्यानंतर आरोपीने जमिनीवर पडलेला फरशीचा तुकडा उचलून मधुकर यांच्या डोक्याच्या उजव्या बाजूला मारून त्यांना जखमी केले. आरोपीने शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिल्याने मुकुटबन पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# महिलांची सुरक्षा वाऱ्यावर

## ⏭ एका वर्षात २८ बलात्कार घटनांची नोंद

**▸विदर्भ केसरी। प्रेमदास तायडे मेळघाट**




■ **काही एनजीओ संस्था शासनाचे मानधन घेऊन कागदपत्रे सुरु असून त्याचा कोणताही फायदा आदिवासी महिलांना होत नाही त्या मुळे महिलांची सुरक्षा मेळघाट मध्ये वाऱ्यावर असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे**

एकटा चिखलदरा पोलीस स्टेशन अंतर्गत एका वर्षातच सर्वाधिक बलात्काराच्या घटना ची नोंद पोलीस स्टेशन मध्ये असल्याची माहिती पुढे आली आहे धारणी व चिखलदरा असे दोन पोलीस स्टेशन असून या ठिकाणी पोलिसांची संख्या कमी आहे भौगोलिक परिक्षेत्र सर्वाधिक मोठे असून पोलिसांना काम करताना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे चिखलदरा तालुक्यांतील आता पर्यंत 32 बलात्कार झाल्याची धक्का दायक माहिती पुढे आली आहे ,इतकेच नव्हे तर घरून पडून जाणाऱ्या महिला व मुली बारा प्रकरणे याची सुद्धा नोंद आहे खुणाची एक घटना, असून सहा घटना गंभीर दुखापतीच्या आहेत कलम 307 अशा 7 घटना घडलेल्या आहेत.

काही मुली काही मुली बेपत्ता असून, त्यांचा पोलीस दप्तरी अजूनही नोंद नाही तर ग्रामीण भागात गावात लैंगिक शोषण झाल्या नंतर ही काही पालकांनी याची नोंद पोलिसात दिली नसल्याचेही धक्कादायक माहिती पुढे आली गावकऱ्यांनी सांगितले आहे.की फिर्याद देऊ नये मुलीचा शोध लागत नाही किंवा पालकांना न्याय मिळत नसल्याने काही पालक गावातच गावपंचायत घेऊन हे प्रकरण अन्याय सहन करून दाबत असल्याचे बोलले जात आहे मेळघाट महिला सुरक्षित आहेत का ? असा प्रश्न निर्माण होत आहे. मेळघाट मध्ये समुपदेशन केंद्र हे कुठे कमी पडत आहे असा प्रश्न उपस्थित होतो शासनाचा समुपदेश जनजागृती करिता जागे होणे गरजेचे आहे एकाच पोलीस स्टेशनमध्ये इतक्या घटना असून धारणी पोलीस स्टेशनमध्ये किती घटना घडल्या याची माहिती पुढच्या अंकात प्रकाशित होईल.

काही गुन्ह्यात मुली अल्पवयीन असल्याचे बोलले जात आहे तर काही गुन्हे पोस्को अंतर्गत असल्याची माहिती पुढे आली आहे.

चिखलदरा पोलीस स्टेशन मध्ये एकच महिला अधिकारी असल्याने कामाचा मोठा ताण आहे. अशा भागात गुन्ह्याचा तपास करताना सक्षम जास्ती संख्याबळ पोलीस महिला कर्मचारी असणे गरजेचे आहे अपूर्ण पोलीस कर्मचाऱ्या मुळे हे कानुन व्यवस्था बाधित असल्याचे दिसून येते. जिल्हाधिकारी अमरावती व जिल्हा ग्रामीण पोलीस अधीक्षक यांनी महिला सुरक्षा आयोग यांनी मेलघाट कडे विषेश लक्ष देऊन आदिवासी महिलांना न्याय द्यावा अशी मागणी सर्वसामान्य आदिवासी बांधवांकडून होत आहे.

# प्रथम डिजिटल गावात पाण्याचा ठणठणात

**▸विदर्भ केसरी। धारणी,**

तालुक्यातील उतावली, दिया आणि हरिसाल गावातील बारमाही वाहणाऱ्या सिपना नदीवरील कोल्हापूरी बंधाऱ्याला गेट न लावल्याने पाणी वाहून गेले आहे. परिणामस्वरूप हरिसाल गावात पाण्याचा ठणठणाट आहे. या कोल्हापुरी बंधाऱ्याच्या पायथ्याशी एक सिंचन विहिर पण आहे. मात्र, आजपर्यंत कवडीचाही उपयोग आदिवासी शेतकऱ्यांना झालेला नाही.

देशातील प्रथम डिजिटल ग्राम म्हणून हरिसालची (ता. धारणी) ख्याती देशभर असली तरी सध्या गावात समस्यांचे डोंगर उभे आहेत. सरपंच गैरकारभारापायी बर्खास्त असून पाण्यासाठी ग्रामस्थांची भटकंती सुरू आहे. गावातील गटारी तुडुंब घाण पाण्याने भरलेल्या आहेत. गल्ली-गल्लीत कचरा साचलेला आहे. गावाची शान समजला जाणारा सिपना नदीवर बांधण्यात आलेला कोल्हापुरी बंधारा गेट न लावल्याने चक्क कोरडा पडलेला आहे. बंधाऱ्यात पाणी नाही तर विहिरीत कसे येणार. बंधारा बांधला तेव्हा जवळच्या शेतांना उन्हाळ्यात पिकांसाठी पाणी मिळते, असे सांगून एक खोल विहिर बांधण्यात आली होती. मात्र, १५ वर्ष लोटले तरी विहिरीला वीज कनेक्शन देण्यात आलेले नसल्याने सिंचनासाठी पाणी मिळालेच नाही. एका माहितीप्रमाणे, बंधाऱ्याच्या देखभाल व दुरुस्तीसाठी दरवर्षी अंदाजपत्रकात पैश्यांची तरतूद असते. मात्र, आजपर्यंत खर्च करण्यात आलेला नाही. फक्त कागदावरच खर्च दाखविला असल्याची शक्यता आहे. सिंचनासाठी असलेली विहीर पण कुचकामी ठरत आहे. पाईललाईन सुद्धा आतापर्यंत भंगारात जमा झालेली आहे.

२०१५ मध्ये मुख्यमंत्रीपदावर देवेंद्र फडणवीस विराजमान होताच हरिसाल गावाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी डिजिटल ग्राम म्हणून घोषित करुन अनेक आधुनिक व भौतिक सुविधा दिलेल्या होत्या. मात्र, आजच्या स्थितीत आरोग्य, संचार, शिक्षण, ग्रामीण प्रशासन, पिण्याचे पाणी, स्वच्छता आणि गावातील रस्ते व इतर विकास कामांचे तीनतेरा झालेले आहे.

# अंजनगावात 'सबका साथ, सबका विकास'

**▸विदर्भ केसरी। अंजनगाव सुर्जी,**

येथील नगरपरिषदेत सत्तेच्या राजकारणापेक्षा विकासाला प्राधान्य देत तीन पक्षीय समन्वयाचं सकारात्मक चित्र समोर आलंय.

नगरपरिषदेतील विविध विषय समित्या, स्थायी समिती आणि सभापती पदांच्या निवड प्रक्रियेत भाजपा, शिवसेना उबाठा, समाजवादी पक्षाला प्रतिनिधित्व देण्यात आलंय. 'सबका साथ, सबका विकास' या ध्येयाचा प्रत्यय या निवडणुकीत पाहायला मिळाला. नगरपरिषदच्या सभागृहात गुरुवार २२ जानेवारीला झालेल्या विशेष बैठकीत विविध समित्यांची रचना जाहीर करण्यात आली. नगराध्यक्ष, उपनगराध्यक्षपद भाजपाकडे असताना शिवसेना उबाठा, समाजवादी पक्षाला सत्तेचा वाटा देण्यात आलंय. यासोबतच विषय समित्यांच्या सभापती आणि सदस्य निवडीतही समतोल साधण्यात आला आहे.

इब्राहिम बेग हसन बेग यांची बांधकाम सभापती तर शिक्षण सभापतीपदी मोहम्मद रेहान अब्दुल मुनाफ यांची निवड करण्यात आली. आरोग्य सभापती प्रवीण देविदास नेमाडे तर पाणी पुरवठा व जलनिस:रण सभापतीपदी प्रियंका मालठाणे यांची झाली आहे. नियोजन व विकास समिती सभापतीपदी उज्वला विलास कविटकर यांची निवड झाली. महिला व बालकल्याण समिती सभापतीपदी सुनिता भास्कर बाळे तर उपसभापतीपदी नसिमाबी रहिमशहा यांची निवड करण्यात आली आहे. स्थायी समिती सदस्यपदी उमेश भोंडे, मोहम्मद आशिक अन्सारी यांची निवड करण्यात आली आहे.

# वसंतराव नाईक यांनी शिक्षण घेतलेल्या वर्गखोल्यांची दुरुस्ती

**▸विदर्भ केसरी।**




माजी मुख्यमंत्री महानायक स्व. वसंतरावजी नाईक साहेब यांनी प्राथमिक शिक्षणाचे धडे जिथे गिरविले ती शाळा मानोरा तालुक्यातील विठोली येथील जिल्हा परिषद शाळा.

या शाळेची ऐतिहासिक वारसाची नोंद म्हणून व्हावी व नाईक साहेबांचे स्मारक व्हावे म्हणून पंचायत समितीच्या माजी सदस्य सौ छाया मनोहर राठोड यांनी सातत्याने वाशिम जिल्ह्याचे पालकमंत्री तथा कृषी मंत्री महाराष्ट्र राज्य मा. दत्ताजी भरणे, मा. इंद्रनील नाईक राज्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्याकडे सतत पाठपुरावा करत या शाळेचा देखभाल दुरुस्तीसाठी निधीची मागणी केल्याने,आज ज्या वर्गखोल्यात नाईक साहेबांचे शिक्षण झाले त्या शाळेची दुरुस्ती करण्यात येतं असल्याने पुढे भविष्यातही येथे स्मारकाच्या बांधकामासाठी निधीची आवश्यकता असल्याचे मत सौ राठोड यांनी व्यक्त केले असून याबाबत सातत्याने माजी जिल्हा परिषद अध्यक्ष चंद्रकांतदादा ठाकरे व राष्ट्रवादीचे कृष्णकुमारभाऊ राठोड यांच्या सहाय्याने नक्कीच भरीव निधी मिळेल अशी भावना व्यक्त करत येथील शाळेच्या पटांगणातील नाईक साहेबांच्या पुतळ्यासाठी तांडा सुधार समितीचे महासचिव नामा बंजारा, माजी सरपंच रामराव चव्हाण डॉ गणेश राठोड यांनी उपोषणाचं मार्ग अवलंबला तेव्हा जिल्हा परिषदेच्या माध्यमातून सौंदर्यीकरण झाले आहे.

जिल्हा परिषद विठोली शाळेचे नाव राज्यात लौकिक असून येथे जिल्हा परिषदेची प्राथमिक व उच्च माध्यमिक शाळा आहे. या शाळेत शिक्षण घेतलेले अनेक विद्यार्थी आज राज्याच्या काना कोपऱ्यांत उच्चपदस्थ शासकीय सेवेत नोकरीला असून काही विद्यार्थी उद्योजकही झाले आहेत. आजही अनेक विद्यार्थी मोठ्या अभिमानाने विठोली जिल्हा परिषद शाळेत शिक्षण झाल्याचे सांगतात. या शाळेला आजपर्यंत मा. ग्रामविकास विभागाचे सचिव, आयुक्त, संचालक, उपसंचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी, खासदार, आमदार आशा अनेक मान्यवरांनी भेटी दिलेल्या असून नाईक साहेबांच्या बालपणीच्या आठवणींची जाणून घेण्याचा प्रयत्न कुतहूलतेने केलेला आहे. ज्याप्रमाणे या शाळेचा सर्वांगीण विकास व्हायला पाहिजे होता, तसा तो आज पर्यंत झालेला नसल्याची खंतही राठोड यांनी व्यक्त केली. येथील जिल्हा परिषदेचे मुख्याध्यापक अर्जुन लोंढे हे सातत्याने या शाळेच्या विकासासाठी अहोरात्र झटत असून आपल्या कल्पक बुद्धीने या शाळेत त्यांनी मोठा बदल घडविण्यात हातभार लावलेला आहे.

# वसंतराव नाईक विद्यालय येथे मुख्यालय शिक्षक द्या

## गटशिक्षणाधिकारी यांना सामाजिक कार्यकर्ते व पालकांची मागणी

**▸विदर्भ केसरी।संघरतन सरदार/**



अडगाव खाडे येथिल वसंतराव नाईक विद्यालय येथ वर्ग ८,९ आणि १० चे विद्यालय आहे त्यामध्ये मुला मुलींची पटसंख्या ६४ च्या जवळपास असल्याची माहिती आहे. पण विद्यालयात एक प्रभारी मुख्याध्यापक अग्रवाल शिक्षक हे आठवड्यात दोन किंवा तीन दिवस हजर असतात तर कधी कधी आठवडाभर नसतात त्यांना गावकरी पालकांनी विचारले असता दोन विद्यालयाचा भार शाळेचे मुख्याध्यापक वर असल्याकारणाने शाळेच्या कामकाजाकरिता व मीटिंग करिता तालुक्याच्या जिल्ह्याच्या ठिकाणी जावे लागत. असल्याने तात्पुरते ठेवलेल्या गावातल्या मुली मुलांना शिकवताना दिसतात. संस्था विद्यार्थ्यांकरिता मुख्यालय शिक्षक सेवा पाठवत नसल्याने गावातील मुलांचे शैक्षणिक नुकसान होताना दिसत आहे. १० वी परीक्षा जवळ येत असल्याने मुलांना योग्य ते शिक्षण भेटत नसल्याने मुले नापास होण्याची शक्यता नाकारता येत नाही आहे.

संस्था मुलांच्या भविष्य व शैक्षणिक नुकसानाकडे हेतूस परस्पर दुर्लक्ष करत नाही आहे. असा प्रश्न गावातील नागरिकांना व पालकांना पडला आहे. संस्थेला याबाबत विचारणा करण्यात यावी . अशी मागणी गावकऱ्यांनी केली आहे. आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाल्यास याला कोण जबाबदार असाही प्रश्न उपस्थित झाला आहे.तातडीने लक्ष घालून शिक्षकांची मुख्यालय नियुक्ती करण्यात यावी. अशी मागणी गावकऱ्यांनी गटशिक्षणाधिकारी यांच्याकडे केली आहे. त्यावेळी पांडुरंग भगत हरिदास माकोडे, भावेश माकोडे, हरिदास अस्वार, मंगेश बोटेये, मनीष इंगळे, संतोष सोनवणे गावकरी पालक वर्गणी मागणी केली आहे.

# श्री संत गजानन महाराज विद्यामंदिरात कौन बनेगा स्कॉलर स्पर्धा

**▸विदर्भ केसरी। मालेगांव ता 22 -**




आदिशक्ती शिक्षण व्यायाम क्रीडा व युवक कल्याण संस्था मालेगाव द्वारा संचलित मालेगांव शहरातील श्री संत गजानन महाराज विद्यामंदिरात आज ता 22 जानेवारी रोजी कौन बनेगा स्कॉलर स्पर्धा पार पडली

कार्यक्रमाच्या सुरुवातीला सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या स्पर्धेसाठी 5 गट करण्यात आले होते. त्यामध्ये राजमाता जिजाऊगट, माता रमाई गट क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले गट, अहिल्याबाई होळकर गट, फातिमा शेख गट यांचा समावेश होता यामध्ये विद्यार्थ्यांना विविध विषयांवर प्रश्न विचारण्यात आले यामध्ये रुद्रायणी गिऱ्हे संयुक्ता लोखंडे अनुष्का आढाव मोहम्मद मुस्तफा, माउली शिंदे प्रिया देवकर परी गाभणे वेदांत गिऱ्हे खुशी कुटे, उम्मे कुसुम देवयानी गाभणे सोहम बळी अधिरा बर्गे स्वरा पवार आरुष बंडगर यांचा समावेश होता या स्पर्धेत फातिमा शेख गट विजयी झाला या गटात अधिरा बर्गे स्वरा पवार आरुष बंडगर हे सहभागी होते

यावेळी कार्यक्रमाचेअध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. अरविंद गाभणे, होते तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्था संचालीका निर्मला गाभणे , अश्विनी गाभणे, रोहिणी गाभणे,आशा गाभणे,मुख्याध्यापिका नीता भालेराव, व्यवस्थापक कपिल भालेराव , शिक्षक सुजित अवचार, आकाश गाभणे, अनुपमा भांदुर्गे,पूजा शर्मा, ,राधा काळे यांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नीता भालेराव, शिक्षिका स्वाती सुरडकर, आकाश गाभणे यांनी केले यावेळी परीक्षक म्हणून कपिल भालेराव सुजित अवचार यांनी केले

# नवनियुक्त नगराध्यक्ष व सभापतींचा 'ॲक्शन मोड'

## पदभार स्वीकारताच स्टेशन परिसराचा कायापालट!

**▸विदर्भ केसरी। मूर्तिजापूर**



मूर्तिजापूर नगरपरिषदेच्या नवनियुक्त नगराध्यक्ष सर्व सभापतींनी बुधवारी आपला पदभार स्वीकारताच जनसेवेचा धडाका लावला आहे. केवळ पुष्पगुच्छ औपचारिकता न स्वीकारता, प्रत्यक्ष कामाला प्राधान्य देत पहिल्याच दिवशी शहरातील मुख्य प्रवेशद्वार असलेल्या स्टेशन विभागातील कचऱ्याचे साम्राज्य हटवून तो परिसर चकाचक केला. आमदार हरीश मारोती पिंपळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा अभिनव उपक्रम राबवण्यात आला. औपचारिक स्वागतापेक्षा जनसेवेला प्राधान्य मंगळवारी नगरपरिषदेच्या सर्व सन्माननीय सभापतींची नियुक्ती होऊन त्यांना विभाग वाटप करण्यात आले होते. बुधवारी या सर्वांचा पालिकेतील पहिलाच दिवस होता. मात्र, कार्यालयात बसून राहण्यापेक्षा नगराध्यक्षांसह सर्व सभापतींनी 'फील्ड'वर जाण्याचा निर्णय घेतला. शहराचे वैभव असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज चौक स्टेशन विभाग परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून कचरा साचलेला होता. शहरात येणाऱ्या प्रवाशांचे स्वागतच अस्वच्छतेने होत असल्याचे चित्र होते. ही बाब लक्षात घेऊन प्रशासनाने तातडीने स्वच्छता मोहीम हाती घेतली.

**नगराध्यक्षांकडून कडक सूचना; कर्मचाऱ्यांची तत्परता**

नगराध्यक्षांनी स्वतः संबंधित विभागाच्या कर्मचाऱ्यांना घटनास्थळी पाचारण केले. "हा परिसर तातडीने स्वच्छ झालाच पाहिजे," अशा कडक सूचना त्यांनी दिल्या. प्रशासनाच्या या आक्रमक पवित्र्यामुळे कर्मचाऱ्यांनीही तत्परतेने संपूर्ण परिसर स्वच्छ केला.

### आमदार पिंपळे यांच्या निधीतून बसवले बाकडे

■ **केवळ स्वच्छता करूनच हे पथक थांबले नाही, तर प्रवाशांच्या सोयीसाठी या ठिकाणी सुंदर बाकडे बसवण्यात आले आहेत. हे बाकडे आमदार हरीश पिंपळे यांनी उपलब्ध करून दिले असून, यामुळे आता रेल्वे स्टेशन परिसरात प्रवाशांना विसावा घेता येणार आहे.**

■ **मुर्तिजापूर शहराचा चेहरामोहरा बदलण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. आजची कारवाई हा तर फक्त प्रारंभ आहे. आमदार महोदयांच्या मार्गदर्शनाखाली शहर विकासाचा हा रथ असाच पुढे नेणार आहोत.**
**हर्षल रामेश्वर साबळे नगराध्यक्ष, मुर्तिजापूर**

■ **शहर स्वच्छ ठेवणे ही केवळ पालिकेची नाही, तर नागरिकांचीही जबाबदारी आहे. त्यानुषंगाने प्रशासनाने परिसरात कुठेही कचरा टाकू नये, कचरा केवळ कचरा गाडीतच द्यावा. उघड्यावर लघवी करून परिसराचे पावित्र्य भंग करू नये. स्वच्छ आणि सुंदर मुर्तिजापूरसाठी प्रशासनाला सहकार्य करावे. असे आवाहन नगराध्यक्ष हर्षल साबळे यांनी केले आहे.**

# अमरावती विद्यापीठ संशोधकांना दक्षिण आफ्रिकेचे पेटेन्ट

**▸विदर्भ केसरी। अमरावती**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या तीन संशोधकांनी दक्षिण आफ्रिकेचे पेटेन्ट प्राप्त करुन आंतराष्ट्रीय स्तरावर अमरावती विद्यापीठाचा बहुमान वाढविला आहे.

प्रा. डॉ. प्रशांत ठाकरे, डॉ. नीरज घनवटे व संशोधक विद्यार्थीनी पुजा मांडवीय यांनी 'ए किट फॉर रॅपिड डिटेक्शन ऑफ मिनिमम इनहिबीटरी कन्सन्स्ट्रेशन ऑफ ॲन्टीबायोटिक्स अगेन्स्ट सिलेक्टेड बॅक्टेरियल स्पेशिस' या विषयावर संशोधन केले आहे. विशिष्ट जीवाणूंविरुद्ध प्रतिजैविकांची परिणामकारकता तपासण्यासाठी लागणारा वेळ या किटमुळे कमी होणार आहे. एवढेच नाही, तर आरोग्य क्षेत्रात अचूक उपचारांसाठी हे संशोधन अत्यंत मोलाचे ठरणार आहे. विशेष म्हणजे डॉ. प्रशांत ठाकरे व डॉ. नीरज घनवटे यांचे हे तिसरे पेटेन्ट आहे. कोरोना काळात या संशोधकांनी अमरावती जिल्ह्यात 'मॉलिक्युलर डायग्नोसिस लॅब' स्थापन करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. जवळपास ५ लाखांहून अधिक कोविड चाचण्या करून त्यांनी जिल्ह्याच्या आरोग्य व्यवस्थेला मोठा हातभार लावला आहे. हैदराबाद येथे नुकत्याच पार पडलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत सुध्दा त्यांच्या या संशोधनाचे कौतुक करुन त्यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या यशाबद्दल कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे तसेच विविध विभागप्रमुखांनी या संशोधक टीमचे अभिनंदन केले आहे. या यशामुळे विद्यापीठाच्या संशोधन कार्याची आता जागतिक स्तरावर दखल घेतली जात असल्याचे देखील सिध्द झाले आहे.

## दिनांक 25 जानेवारी रोजी राष्ट्रीय मतदार दिवसाचे आयोजन

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

गडचिरोली : दिनांक 25 जानेवारी हा भारत निवडणूक आयोगाचा स्थापना दिवस असून या वर्षी दिनांक 25 जानेवारी, 2026 ला 16 वा राष्ट्रीय मतदार दिवस जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली, मतदार नोंदणी अधिकारी, सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी व मतदान केंद्रस्तरीय अधिकारी स्तरावर विविध उपक्रमांनी साजरा करण्यात येणार आहे. निवडणूक विषयक जागृती निर्माण करण्याकरीता चित्रकला स्पर्धा, रांगोळी स्पर्धाचे आयोजन करण्यात आलेले असुन शाळा / महाविद्यालय स्तरावर आयोजीत करण्यात आलेल्या स्पर्धा गुणक्रमे पहिल्या तीन क्रमांकावरील विद्यार्थ्यांचा सत्कार जिल्हा स्तरावर आयोजीत करण्यात आलेल्या राष्ट्रीय मतदार दिवसाचे कार्यक्रमात करण्यात येणार आहे. मतदान प्रक्रियेमध्ये युवा मतदारांचा सहभाग वाढावा व त्यांच्यात मतदानाविषयी जागृती निर्माण व्हावी यासाठी जिल्हा स्तरावरील राष्ट्रीय मतदार दिवसाच्या कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा नियोजन समिती सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली येथे दिनांक 25 जानेवारी, 2026 दुपारी 12.00 वाजता करण्यात येणार आहे.
16 व्या राष्ट्रीय मतदार दिवसासाठी " My India My Vote" हा विषय (Theme) आयोगाकडून देण्यात आलेला आहे. राष्ट्रीय मतदार दिवसाचे औचित्य साधून मतदारांना मतदानाबाबत शपथ घेण्याचा कार्यक्रम आयोजीत करण्यात आलेला आहे असे प्र. उप जिल्हा निवडणुक अधिकारी, गडचिरोली यांनी कळविले आहे.

# 10 हजार रुपयांची लाच घेतांना क्षेत्र सहायक महेश धामनगे रंगेहाथ एसीबी च्या जाळ्यात...!

## लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गडचिरोली पथकाची कारवाई

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे**

सिरोंचा : वन जमिनीवर अवैधपणे काम करत असल्याचे सांगत जप्त केलेल्या ट्रॅक्टरवर दंड कमी करण्यासाठी 10 हजार रुपयांची लाच घेताना सिरोंचा वन विभागातील एका क्षेत्र सहाय्यकाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (ACB) गडचिरोली पथकाने रंगेहाथ पकडले. ही कारवाई बुधवारी (21 जानेवारी) रोजी कमलापुर वनपरिक्षेत्र कार्यालय अंतर्गत येत असलेल्या राजाराम (खां) उपक्षेत्रात करण्यात आली. क्षेत्र सहायक महेश जयंतराव धामनगे (वय ४७) असे लाचखोर अधिकाऱ्याचे नाव असून त्यांच्यावर उपपोस्ट राजाराम (खां) येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

एसीबीने दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार हा तेलंगाणा राज्यातील असून राजाराम (खां) येथे काकांच्या ट्रॅक्टरने शेतकऱ्यांच्या शेतीची मोबदला घेऊन मशागत करत होते. शेतात काम सुरू असताना दोन वनरक्षकांनी 'वनजमिनीवर अवैध काम' असा आरोप करून ट्रॅक्टर जप्त केला. नंतर राजारामचे क्षेत्र सहायक महेश धामनगे यांनी संपर्क साधून गुन्हा दाखल न करता कमी दंडाची तडजोड करण्यासाठी 25,000/- रुपयांची लाच मागितली. तक्रारदाराने तात्काळ ACB ला फोन करून तक्रार नोंदवली.

या तक्रारीवरून उपविभागीय पोलिस अधिकारी विक्रांत सगणे यांनी दोन पंचांसह गोपनीय शहानिशा केली. १० हजार रुपयांची मागणी निष्पन्न झाल्याने सापळा रचला.विशेष नक्षलप्रभावित राजाराम सारख्या गावात महेश धामनगे यांनी लाच स्वीकारताना एसीबीच्या पथकाने रंगेहाथ पकडले. त्यांच्या राजाराम (खां) व चंद्रपूर येथील निवासस्थानांवर गडचिरोली व चंद्रपूर युनिट्सकडून घराची झडती घेण्यात आली.

ही कारवाई लाच लुचपत प्रतिबंधक विभाग नागपूर परिक्षेत्राचे पोलिस अधीक्षक दिगंबर प्रधान,अप्पर पोलीस अपर पोलिस अधीक्षक माधुरी बाविस्कर व विजय माहुलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उप अधीक्षक विक्रांत सगणे,पो.नि.किरण बगाटे, पो.हवा.किशोर जौंजारकर व इ.टीमने केली.





## संक्षिप्त



### आझाद हिंद केसरी शंकरपटात धावल्या ४७८ बैलजोड्या

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी**

बहीरम यात्रेतील बहूचर्चीत हिंद केसरी शंकरपटाचा अंतीम दिवस अतीशय उत्साह व प्रचंड गर्दीत रोमांचकारी वातावरणात पार पडला.या वर्षीच्या शंकरपटात आजपर्यंतचा सर्वच बाबतीत उच्चांक गाठणारा रोमहर्षक अनुभवाने हा शंकरपट पार पडला.सर्वच विक्रम मोडणारा ह्या शंकरपटामधे ४७८ बैलगाड्यांनी सहभाग घेऊन उच्चांक गाठला.पटाचे आयोजक आमदार प्रविण तायडे यांच्या प्रयत्नाने संपन्न झालेल्या या शंकरपटातील विजयी बैलजोडी मालक व त्यांच्या धुरकर्यांना जाहीर केल्यानुसार बक्षिस वितरण करण्यात आले.जनरल गटातील प्रथम क्रमांक राज विनोद दमये,वऱ्हा, ता.तिवसा यांच्या जोडीला मिळाला.दुसरा क्रमांक नीतु तीवारी,यवतमाळ यांना होंडा युनीकार्न तर तृतीय क्रमांक मिशु अन्विका राठोड यांना ८१ हजार रुपयाचे रोख बक्षिस देण्यात आले.तर ब गटातील विजेत्यांना ओंकार खोंडकर,आंबेवाडी यांना प्रथम क्रमांकाचे हीरो होंडा डीलक्स तर द्वितीय क्रमांकाचे आतिशसेठ वर्मा,वाशिम यांना ५१ हजाराचे व तृतीय क्रमांक विशाल राजपुत, कपातवाडी यांना ३५ हजाराचे रोख बक्षिस मान्यवर पाहुण्यांचे हस्ते देण्यात आले. याप्रसंगी आमदार प्रविण तायडे यांनी उपस्थित बैलगाडी मालक व त्यांचे धुरकरी यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.या पारीतोषिक वितरणाच्या कार्यक्रमाला भाजपाचे गजानन कोल्हे, प्रविण तोंडगावकर, शंकर मालठाने, रमेशभाऊ मडघे , रूपेश ढेपे ,रीतेश नवल,अतुल वाट,बाळासाहेब सोनार, मुरली माकोडे,कुंदन यादव,रमेश तायवाडे,हर्शल धुळे व भाजपा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### उच्च प्राथमिक शाळा रामनगर, गडचिरोली येथे "सकाळ" कडून चित्रकला स्पर्धा

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

गडचिरोली : गोवा आणि महाराष्ट्र मधील सर्वात मोठी चित्रकला स्पर्धा दैनिक सकाळ वृत्तपत्राच्या माध्यमातून घेण्यात आली होती. त्यामध्ये पीएम श्री पंडित जवाहरलाल नेहरू नगर परिषद डिजिटल उच्च प्राथमिक शाळा रामनगर गडचिरोली या शाळेच्या विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला असून विविध प्रकारचे चित्र तयार केले गेले त्या अनुषंगाने विद्यार्थिनी, विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. यावेळी शाळेचे शिक्षक वृंद, सकाळ वृत्त समूहाचे कर्मचारी उपस्थित होते.

## आश्रमशाळेतील चिमुकल्या हिमांशीचे अप्पर आयुक्तांनी केले कौतुक ; नागपूर कार्यालयात रंगला प्रशासकीय संवाद

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी**

कोरची : शासकीय प्रशासकीय यंत्रणेचे कामकाज जवळून पाहता यावे आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी, या उद्देशाने नागपूर येथील मा. आदिवासी अप्पर आयुक्त आयुषी सिंह यांच्या कल्पनेतून साकरलेला `अपर आयुक्त कार्यालय ओळखा संवादमंच उपक्रमा अंतर्गत कार्यालयात आयोजित शैक्षणिक भेटीत तिसरीतील विद्यार्थिनी कु. हिमांशी महेश नरोटे हिने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. तिच्या आत्मविश्वासपूर्ण संवादशैलीने प्रभावित होऊन मा.अप्पर आयुक्त आयुषी सिंह यांनी चक्क तिला आपल्या खुर्चीवर बसवून तिचे कौतुक केले. २१ जानेवारी रोजी शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, कोरची येथील १० विद्यार्थ्यांच्या पथकाने नागपूर येथील कार्यालयाला भेट दिली. यावेळी विद्यार्थ्यांना कार्यालयीन कामकाज, प्रशासकीय प्रक्रिया आणि आदिवासी विकास






विभागाच्या विविध योजनांची सविस्तर माहिती देण्यात आली. हिमांशीचा आत्मविश्वास आकर्षणाचे केंद्र ठरला. या दौऱ्यात इयत्ता तिसरीत शिकणाऱ्या हिमांशी नरोटे हिच्या निरागस पण तितक्याच प्रभावी बोलण्याने सर्वांना थक्क केले. तिची समज आणि शिकण्याची उत्सुकता पाहून अप्पर आयुक्त आयुषी सिंह यांनी तिचे विशेष कौतुक केले. केवळ कौतुकच नाही, तर तिला आपल्या खुर्चीवर बसवून तिच्याशी मनमोकळा संवाद साधला. एका चिमुकलीचा बौद्धिक चाणाक्षपणा पाहून उपस्थित अधिकाऱ्यांनी तिचे अभिनंदन केले. यावेळी श्रीमती गिरीजा देवीदास उईके सहा. प्रकल्प (शिक्षण) अधिकारी नागपूर उपस्थित होत्या.

■ **"अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये प्रशासनाविषयी आवड निर्माण होत असून त्यांच्या भविष्यातील वाटचालीस नवी दिशा मिळत आहे."**
**उमाकांत ढोक,**
मुख्याध्यापक, आश्रमशाळा कोरची.

### सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव

■ हिमांशी व वर्गशिक्षक मनोज आचार्य यांच्या या यशाबद्दल गडचिरोलीचे सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी अरुण एम, सहाय्यक प्रकल्प अधिकारी (शिक्षण), डॉ. प्रभू सादमवार सहा.प्रकल्प अधिकारी (शिक्षण) गडचिरोली यांनी तिचे अभिनंदन केले आहे. हिमांशीच्या या आत्मविश्वासामुळे कोरची परिसरात तिचे कौतुक होत असून, आश्रमशाळेतील इतर विद्यार्थ्यांसाठी ती प्रेरणास्थान ठरली आहे.

## अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभांसाठी गौण वनउत्पादन विक्रीवर कार्यशाळा

**भामरागड :** अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभांना गौण वनउत्पादनांच्या विक्री व व्यवस्थापनाबाबत सक्षम करण्याच्या उद्देशाने पंचायत समिती भामरागड येथील सभागृहात पेसा कक्ष (पंचायत विभाग) यांच्या वतीने एकदिवसीय गौण वनउत्पादन विक्री व व्यवस्थापनावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेस श्री. प्रमोद भोयर, जिल्हा व्यवस्थापक (पेसा), जिल्हा परिषद गडचिरोली हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. त्यांनी पंचायतीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रावर विस्तारीत करणे) अधिनियम 1996, (पेसा कायदा), महाराष्ट्र ग्रामपंचायतीसंबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रावर विस्तारीत करण्याबाबत) नियम, 2014, पेसा 5 टक्के थेट निधी योजना, तसेच अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वनहक्क) कायदा 2006, त्याअंतर्गत नियम 2008 व सुधारणा 2012 यांची सविस्तर माहिती दिली. अनुसूचित क्षेत्रात गौण वनउत्पादनांचे नियोजन, साठवणूक, विक्री व व्यवस्थापन ग्रामसभा स्तरावर कशा प्रकारे करावे, तसेच ग्रामसभा व पंचायतींना प्राप्त झालेल्या मालकी हक्कांचा कायदेशीर व प्रभावी वापर कसा करता येईल, याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. तसेच, सर्व ग्रामसभा व ग्रामपंचायतींनी एकत्रितपणे गौण वनउत्पादन विक्री किंवा लिलाव प्रक्रिया राबविल्यास अधिक दर मिळण्यास मदत होते आणि खर्चातही बचत होते. तसेच शासनाशी समन्वय साधून ही प्रक्रिया राबविल्यास विविध शासकीय विभागांकडून तांत्रिक व प्रशासकीय सहकार्य उपलब्ध होते. विक्री व व्यवस्थापन प्रक्रिया पारदर्शक ठेवून संबंधित विभागांना विश्वासात घेण्याचे आवाहन त्यांनी केले. कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी श्री. गोंगले साहेब गटविकास अधिकारी, पंचायत समिती भामरागड , तर श्री. माकडे साहेब, पंचायत विस्तार अधिकारी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यशाळेस पंचायत समिती भामरागड अंतर्गत येणाऱ्या सर्व ग्रामपंचायतींचे सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामसभा सदस्य, सामूहिक वनहक्क समिती व ग्रामसभा कोष समितीचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यशाळेचे आयोजन व समन्वय श्री. श्रीकांत नेताम, तालुका व्यवस्थापक (पेसा), पंचायत समिती भामरागड यांनी केले. या कार्यशाळेमुळे अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभा प्रतिनिधींमध्ये गौण वनउत्पादन व्यवस्थापनाबाबत जागरूकता वाढली असून कायदेशीर हक्कांच्या प्रभावी अंमलबजावणीस चालना मिळणार आहे.



## शंकरपट शर्यतीचा थरार : 11 लक्ष रुपयाच्या बक्षिसांची लयलूट

अमरावती : प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चु कडु यांनी बहिरम यात्रेतील तमाशा फड सारख्या कुप्रथांना हद्दपार केले. तेव्हापासून सातपुडाच्या पायथ्याशी भरत असलेल्या बहिरम यात्रा परिसरामध्ये दरवर्षी शंकर पट आयोजन करण्यात येते. यावर्षीही २२ ते २४ जानेवारी दरम्यान सलग ३ दिवस विदर्भ केसरी शंकर पटाचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेमध्ये ११ लक्ष रुपयाच्या बक्षिसांची लयलुट होणार आहे. या बैल जोडीच्या शर्यतीत अमरावती जिल्हासह इतर जिल्हा व शेजारच्या राज्यातील बैलजोड्या शर्यती साठी मोठ्या प्रमाणात सहभागी होणार आहे ३ गटात होणाऱ्या यात शर्यतील एकूण ११ लक्ष रुपयाची बक्षीस जाहीर करण्यात आली आहे. तर धुरकरी सन्मान बक्षिसाच्या निर्धारित केलेले केलेले रोख बक्षिसे सुद्धा देण्यात येणार आहे. या स्पर्धेमध्ये अचूक मिनिट व सेकंद सांगण्याचे काम म्हणजे घड्याळाची जबाबदारी हिंगोलीचे राजु मंडाळे व इतर सहकारी सांभाळणार आहे. विदर्भ केसरी शंकरपट स्पर्धेचे उद्घाटन हे चांदूरबाजार नवनिर्वाचित नगराध्यक्ष मनीषा नागलीया, शल्य चिकीत्सक डॉ. प्रभु जवंजाळ, अचलपूर उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव, चांदूरबाजार तहसीलदार सोनल सूर्यवंशी, शिरजगाव कसबा पोलीस स्टेशन ठाणेदार महेंद्र गवई, गटविकास अधिकारी डॉ.निलेश वानखडे उपस्थित होते.

## सभापतीपदाला ठाम नकार देत अर्चना निंबोळ यांचा आदर्श

### गडचिरोलीच्या राजकारणात नवा अध्याय..!

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे**

गडचिरोली : राजकारण म्हणजे पद, सत्ता आणि वर्चस्वाची स्पर्धा अशी सर्वसाधारण धारणा असताना, गडचिरोली नगरपालिकेत घडलेल्या एका घटनेने ही समजूत मोडून काढली आहे. नगरपालिकेच्या सभापतीपदासाठी नाव निश्चित असतानाही भाजपच्या जेष्ठ नगरसेविका सौ. अर्चना निंबोळ यांनी स्वतःहून सभापतीपद स्वीकारण्यास नकार देत, नव्याने निवडून आलेल्या नगरसेवकाला संधी देण्याची मागणी केल्याने राजकीय वर्तुळात मोठी चर्चा रंगली आहे.



गडचिरोली नगरपालिकेच्या अलीकडील निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला 15 नगरसेवक निवडून आणत निसटता विजय मिळाला होता. त्यानंतर सत्तास्थापनेसाठी झालेल्या नाट्यमय घडामोडी, आमदार व पदाधिकाऱ्यांमधील तीव्र मतभेद आणि वाढलेले राजकीय तापमान यामुळे वातावरण तणावपूर्ण झाले होते. अखेर वरिष्ठ पातळीवरील निर्णयानुसार भाजपने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला महायुतीत सहभागी करुन सत्ता स्थापन केली. त्यानुसार पाणीपुरवठा सभापतीपद राष्ट्रवादीच्या वाट्याला देण्यात आले. या पार्श्वभूमीवर महिला व बालकल्याण सभापतीपदासाठी सौ. अर्चना निंबोळ यांचे नाव पुढे आले. मात्र, सर्वांनाच आश्चर्याचा धक्का देत त्यांनी अत्यंत नम्रतेने हे पद नाकारले. "मी पक्षाच्या संघटनात्मक कामात समाधानी आहे. मला कुठल्याही पदाची लालसा नाही. भाजपने मला आणि यावेळी माझ्या पत्नीला नगरसेवक म्हणून निवडून आणून खूप काही दिले आहे," असे स्पष्ट मत त्यांनी वरिष्ठ नेत्यांसमोर मांडले. सौ अर्चना निंबोळ या पहिल्यांदा गडचिरोली शहरातून निवडून आल्या आहेत. त्यांच्या यजमान केशव निंबोळ यांनीही मागील काळात नगरसेवक म्हणून पाणीपुरवठा सभापतीपदाची जबाबदारी अत्यंत सक्षमपणे पार पाडली होती. त्या अनुभवाच्या आधारावर अर्चना निंबोळ यांनाही सभापतीपद देण्याचा निर्णय ठरलेला असतांनाही, त्यांनी स्वाभिमानाने आणि उदारतेने पद नाकारून राजकीय परिपक्वतेचा आदर्श घालून दिला. सभापतीपदाच्या बैठकीदरम्यान त्यांनी दुसऱ्याला संधी देण्याची केलेली मागणी ही आजच्या स्वार्थी राजकारणात दुर्मीळ ठरणारी बाब असल्याची प्रतिक्रिया उमटत आहे.

सत्तापक्षासह विरोधी पक्षातील नगरसेवकांनीही त्यांच्या या निर्णयाचे खुलेपणाने कौतुक केले आहे. सत्ता, पद आणि कुरघोडीपेक्षा संघटन, मूल्ये आणि राजकीय सुसंस्कृततेला प्राधान्य देणारे हे नेतृत्व गडचिरोलीच्या राजकारणात सकारात्मक संदेश देणारे ठरले असून, सौ. अर्चना निंबोळ यांचा हा निर्णय अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

## बॉक्सिंग स्पर्धेत अकोला क्रीडा प्रबोधिनीसह पुणे, कोल्हापूरचे वर्चस्व

### मूर्तिजापूरात पारितोषिक वितरण सोहळा, आमदार हरीश पिंपळे यांच्या हस्ते विजेत्यांचा गौरव

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी**

मूर्तिजापूर : क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित १९ वर्षांखालील मुले-मुलींच्या राज्यस्तरीय शालेय बॉक्सिंग स्पर्धेचा गुरुवारी दिमाखात समारोप झाला. या स्पर्धेत क्रीडा प्रबोधिनी अकोला, पुणे व कोल्हापूर विभागाच्या खेळाडूंनी आपल्या आक्रमक खेळाच्या जोरावर वर्चस्व गाजवले. विजेत्यांना आमदार हरीश पिंपळे यांच्या हस्ते पुरस्कार स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा मूर्तिजापूरचे आमदार हरीश पिंपळे यांच्या शुभहस्ते पार पडला. यावेळी खेळाडूंना संबोधित करताना



आमदार हरीश पिंपळे म्हणाले की, "तीन दिवस चाललेल्या या स्पर्धेत महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातून आलेल्या खेळाडूंनी उच्च दर्जाच्या खेळाचे प्रदर्शन केले आहे. ग्रामीण भागातील खेळाडूंमध्ये मोठी जिद्द असून, अशा स्पर्धांमधूनच उद्याचे ऑलिम्पिकवीर घडतील." त्यांनी सर्व विजेत्यांचे कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

मैदानात चुरशीची लढत: मुंबई आणि नागपूरची दमदार कामगिरी एकूण १२ वजन गटांमध्ये पार पडलेल्या या स्पर्धेत मुलींच्या गटात कमालीची चुरस पाहायला मिळाली. ४५ किलोखालील गटात मुंबईच्या दुपर्ता सौद हिने सुवर्णपदक पटकावत पुण्याच्या सृष्टी चोरगेला रौप्यपदकावर रोखले. तर ५४-५७ किलो गटात मुंबईच्याच अंकिता शर्मा हिने सुवर्णपदकावर आपली मोहोर उमटवली. कोल्हापूरच्या श्रुती शिंदे हिने ६९-७५ किलो गटात सुवर्ण यश मिळवत कोल्हापूरचा दबदबा सिद्ध केला.

विजेत्यांची विभागवार कामगिरी

वजन गट सुवर्णपदक विजेता विभाग/संघ
४५-४८ किलो समिक्षा सोलंकी क्रीडा प्रबोधिनी
४८-५१ किलो श्रद्धा खोब्रागडे क्रीडा प्रबोधिनी
५१-५४किलो स्वाली बारभुंजे नागपूर
५७-६० किलो करुणा मैराले मुंबई
६०-६४ किलो सलोनी कुंभारे नागपूर
६४-६६ किलो सान्वी महाजन नागपूर
६६-६९ किलो समृद्धी भोंगे अमरावती
७५-८१ किलो भक्ती चुंगडे क्रीडा प्रबोधिनी
८१ किलो वरील वेदश्री गोतमारे अमरावती

राष्ट्रीय निवडीसाठी स्पर्धेचे महत्त्व या स्पर्धेत नागपूर आणि कोल्हापूर विभागातील खेळाडूंनी सर्वाधिक पदकांची कमाई करत सातत्यपूर्ण कामगिरी दाखवली. उपांत्य फेरीत पराभूत झालेल्या दोन्ही खेळाडूंना कांस्यपदक देऊन गौरवण्यात आले. ही स्पर्धा आगामी राष्ट्रीय स्तरावरील शालेय बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड चाचणी म्हणून महत्त्वाची मानली जात असल्याने सर्वच खेळाडूंनी आपली सर्वस्व पणाला लावले होते. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाने स्पर्धेच्या यशस्वी नियोजनाबद्दल समाधान व्यक्त केले आहे.

## योजनेअंतर्गत मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेचे नॅशनल स्कॉलरशिप पोर्टल (NSP) वर अर्ज नोंदनी करा

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे

गडचिरोली : गडचिरोली जिल्हातील प्राचार्य मुख्याध्यापकांना सुचित करण्यात येते कि, PM YASASVI केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत राज्यातील विजाभज ,इमाव व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थाकरीता भारत सरकार मॅट्रिकपुर्व व मॅट्रिकोत्त-शिष्यवृत्ती योजना इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे शासन निर्णय दिनांक 20जुन 2025 नुसार लागु करण्यात आलेली असून या योजनेंअंतर्गत मॅट्रीकपूर्व इयत्ता 9 वी व 10 वी तसेच मॅट्रीकोत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज केंद्र शासनाच्या hhttp://scholarship.gov.in (nsp portal) या संकेतस्थळावर नोंदणी करण्याची अंतिम तारीख 31 जानेवारी 2026 असून संबंधित शाळा महाविद्यालय यांचे मार्फत Institute Level Verification साठी शेवटची तारीख ही 15 फेब्रुवारी 2026 अशी आहे. याची जिल्ह्यातील सर्व पात्र विद्यार्थी व संबंधित प्राचार्य व मुख्याध्यापक यांनी नोंद घ्यावी. यासंबंधाने काही अडचण असल्यास कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन डॉ. सचिन मडावी, सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण कार्यालय गडचिरोली यांनी केले आहे.

## संक्षीप्त



### लोहखनिज वाहतूक करणाऱ्या ट्रकची दुचाकीला धडक, दोन गंभीर तर एक किरकोळ जखमी

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

चामोर्शी / आष्टी :- लोहखनिज वाहतूक करणाऱ्या ट्रकची दुचाकीला धडक दिल्याने दोन तरुण गंभीर तर एक तरुण किरकोळ जखमी झाल्याची घटना दि. २२ जानेवारी ला सकाळी ९.३० वाजताचे दरम्यान चौडमपल्ली गावाजवळ घडली. दुचाकिस्वार हे गुंडापल्ली येथून धनूरला स्टाईल लावण्याचे काम करण्यासाठी जात असताना चौडमपल्ली गावाजवळ आलापल्ली कडून येणाऱ्या ट्रकने धडक दिली. त्यामुळेदुचाकीस्वार खाली कोसळले व जखमी झाले. सदर ट्रक फरार झाला आहे. जखमींचे नाव तेजसिंग राजपूत वय २२, दिपक राजपूत २४, अशोक राजपूत २३, तिघेही गुजरात राज्यातील असून हल्ली मुक्काम गुंडापल्ली जि. गडचिरोली येथे राहून स्टाईल लावण्याचे काम करत होते. येणाऱ्या ट्रकने धडक दिली. त्यांच्या मागे येत असलेल्या भावाने आष्टी ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. असून दोघांचे पायाचे हाड मोडले असल्याने पुढील उपचारासाठी पाठविण्यात आले आहे. अपघाताचा तपास पोलीस निरीक्षक विशाल काळे यांच्या मार्गदर्शनाखाली आष्टी पोलीस करीत आहेत.

# सोन्याच्या चैनीसाठी मित्रानेच मित्राचा घेतला जीव : अहेरीत आरडी एजंट हत्येचा उलगडा..!

## दारूच्या व्यसनातून जन्मलेली क्रूरता.!

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे

अहेरी :- तालुक्यातील आलापल्ली येथील आरडी (आवर्ती ठेव) एजंट रवींद्र नामदेवराव तंगडपल्लीवार (४९) यांच्या निघृण हत्येचा उलगडा अखेर तिसऱ्या दिवशी अहेरी पोलिसांनी केला. केवळ गळ्यातील सोन्याच्या चैनीच्या लोभापोटी दारूच्या व्यसनाने ग्रासलेल्या मित्रानेच ही हत्या केल्याचे धक्कादायक वास्तव मंगळवारी (२१) उघडकीस आले. या घटनेने संपूर्ण अहेरी तालुक्यासह जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, समय्या मल्लया सुंकरी (३५, रा. मद्दीगुडम, ता. अहेरी) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. आरोपीला दारूचे तीव्र व्यसन असून, रवींद्र तंगडपल्लीवार यांच्या गळ्यातील सोन्याची चैन पाहून ती लंपास करण्याचा कट त्याने रचला होता. १८ जानेवारी रोजी आरोपीने आपल्या आईच्या मोबाईलवरून रवींद्र यांना फोन करून, मला आरडी काढायची आहे, मदतीला या, असे सांगत चंद्रपूर मार्गावरील परिसरात बोलावले.

दारुपार्टीनंतर निर्जनस्थळी हल्ला - दोघेही नागमंदिर परिसरातील निर्जनस्थळी गेले. तेथे दोघांमध्ये दारुपार्टी झाली. रवींद्र पूर्णपणे नशेत असल्याची खात्री झाल्यानंतर आरोपीने पाठीमागून सत्तूरने पहिला वार केला. जीव वाचविण्यासाठी रवींद्र यांनी प्रतिकार केला, मात्र जोरदार वारात त्यांच्या हाताची बोटे कापली गेली. यानंतर आरोपीने मृत्यू होईपर्यंत त्यांच्यावर सलग अनेक वार करून निघृण हत्या केली.

### सोन्याची चैन लंपास करून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न

■ मृत्यूची खात्री झाल्यानंतर आरोपीने रवींद्र यांच्या गळ्यातील सोन्याची चैन काढून घेतली. गुन्ह्याचा पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतकाची दुचाकी जंगलात काही अंतरावर उभी करून तो घरी परतला. पुढे तेलंगणातील बेज्जूर येथे जाऊन त्याने सोन्याची चैन विकल्याचे तपासात उघड झाले आहे.

### तांत्रिक तपासातून आरोपी जेरबंद

■ ठोस प्रत्यक्ष पुरावा नसतानाही अहेरीचे पोलिस निरीक्षक हर्षल एकरे यांनी तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे अवघ्या तिसऱ्या दिवशी मद्दीगुडम येथून आरोपीला अटक केली. आरोपीला अहेरी न्यायालयात हजर केले असता, नऊ दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली.



### हत्येच्या धक्क्यातून सावरत नाही तोच अपघातात आणखी दोन बळी

■ रवींद्र यांच्या हत्येचा धक्का कुटुंब पचवत नसतानाच, त्यांच्या अंत्यविधीसाठी येत असलेल्या चुलत सासऱ्यांसह अन्य एका व्यक्तीचा अपघातात मृत्यू झाला. एका व्यक्तीच्या व्यसनाधीन वृत्तीमुळे दोन कुटुंबांचे हसते-खेळते संसार उद्ध्वस्त झाल्याची हृदयद्रावक घटना अहेरी तालुक्यात चर्चेचा विषय ठरली आहे.

# गडचिरोली जिल्ह्यात 'अरुणोदय' सिकलसेल अभियानाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद !

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे

गडचिरोली : मा. ना. आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांचे संकल्पनेतून सार्वजनिक आरोग्य विभाग अरुणोदय सिकलसेल विशेष अभियान दिनांक 20 जानेवारी ते 7 फेब्रुवारी पर्यंत महाराष्ट्रातील 21 जिल्ह्यात राबवत आहे. गडचिरोली जिल्ह्यात 'अरुणोदय सिकलसेल विशेष अभियानाला' सर्वत्र उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. १५ जानेवारीपासून सुरू झालेल्या या अभियानांतर्गत आतापर्यंत हजारो नागरिकांनी आपली सिकलसेल चाचणी पूर्ण केली असून, गावोगावी आरोग्य शिबिरांना नागरिकांची मोठी गर्दी दिसून येत आहे. लोकसहभागातून अभियान यशस्वी: जिल्ह्यातील दुर्गम भागांपासून ते शहरांपर्यंत सर्वच ठिकाणी तरुण, महिला आणि शालेय विद्यार्थ्यांनी या मोहिमेत हिरिरीने सहभाग घेतला आहे. अनेक ठिकाणी ग्रामसभांमध्ये सिकलसेल जनजागृती करण्यात येत असून, आरोग्य पथकांद्वारे घरोघरी जाऊन समुपदेशन केले जात आहे. मिळणारा हा प्रतिसाद पाहता, गडचिरोली जिल्हा सिकलसेल मुक्तीच्या दिशेने वेगाने पाऊल टाकत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. हे अभियान ७ फेब्रुवारी २०२६ पर्यंत सुरू राहणार आहे. ज्या नागरिकांनी अद्याप आपली किंवा आपल्या पाल्यांची तपासणी केलेली नाही, त्यांनी तात्काळ जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात किंवा उपकेंद्रात जाऊन तपासणी करून घ्यावी. "अरुणोदय अभियानाचे यश हे केवळ आरोग्य विभागाचे नसून ते जिल्ह्यातील प्रत्येक सजग नागरिकाचे आहे. सिकलसेल हा आजार मुळापासून संपवण्यासाठी १०० टक्के स्क्रीनिंग होणे गरजेचे आहे. ज्यांना अद्याप आपली आरोग्य स्थिती (Status) माहित नाही, त्यांनी तपासणी करुन घ्यावी, आपल्या एका चाचणीमुळे भविष्यातील पिढीचे आरोग्य सुरक्षित होऊ शकते. तरी, उर्वरित काळात जास्तीत जास्त नागरिकांनी या अभियानात सहभागी होऊन 'सिकलसेल मुक्त गडचिरोली'च्या संकल्पात आपले योगदान द्यावे," असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ प्रताप शिंदे जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद गडचिरोली यांनी केले आहे. सर्व शासकीय आरोग्य संस्थांमध्ये चाचणीची सोय,तपासणी पूर्णपणे मोफत आहे, आरोग्य कार्ड: तपासणीनंतर तात्काळ सिकलसेल स्टेटस कार्ड दिले जात आहे. चला, आपण सर्व मिळून 'अरुणोदय' अभियानात सहभागी होऊया आणि सिकलसेलला हद्दपार करूया असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद गडचिरोली सुहास गाडे यांनी केले आहे.



# श्रीराम विद्यालय व संस्कार पब्लिक स्कूल कुरखेडा येथील विद्यार्थ्यांनी लुटला टी-२० भारत वर्सेस न्युझीलँड क्रिकेट सामन्यांचा आनंद

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

कुरखेडा : आदिवासी ग्रामीण विकास शिक्षण संस्था द्वारा संचालित श्रीराम विद्यालय तथा संस्कार पब्लिक स्कूल कुरखेडा येथील विद्यार्थ्यांच्या क्रिकेटप्रेमाला प्रोत्साहन देण्यासाठी दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सुद्धा नागपूर येथील आंतरराष्ट्रीय जामठा स्टेडियम मध्ये भारत व न्यूझीलंड यांच्यात होणारा टी.२० क्रिकेट सामना पाहण्यासाठी शैक्षणिक व मनोरंजनात्मक सहलीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सहल दरम्यान विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा भावना, संघभावना व शिस्त यांचे महत्त्व शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली समजावून सांगण्यात आले सोबतच भारताच्या संघाला प्रोत्साहन देण्यासाठी विद्यार्थ्यांनी तिरंगा, फलक व घोषणा तयार केल्या होत्या. सामना पाहताना विद्यार्थ्यांचा आनंद व उत्साह पाहण्यासारखा होता. या उपक्रमामुळे श्रीराम विद्यालय व संस्कार पब्लिक स्कूल कुरखेडा येथील ११३ विद्यार्थ्यांनी टी- 20 क्रिकेट सामन्याचा मनमुराद आनंद लुटला व विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्याचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला. टी ट्वेंटी क्रिकेट सामना बघण्यासाठी जाणाऱ्या गाड्यांना हिरवी झेंडी दाखवण्याकरिता यावेळी शाळा समिती अध्यक्ष संस्था कोषाध्यक्ष वामनराव फाये, संस्था सचिव दोषहरजी फाये यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून मॅच बघण्यासाठी शालेय विद्यार्थी यांना रवाना करण्यात आले. यावेळी शाळा समिती सदस्य चांगदेव फाये यांनी सुद्धा विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. संस्था सहसचिव प्राचार्य नागेश्वर फाये , व संस्कार पब्लिक स्कूलचे प्राचार्य देवेंद्र फाये यांच्या मार्गदर्शन खाली विद्यार्थ्यांना भारत आणि भारत आणि न्युझीलँड क्रिकेट सामना बघण्याकरिता संधी मिळाली. यावेळी प्रा. विनोद नागपूरकर,हरीश टेलका, स्वप्निल खोब्रागडे, प्रशांत हटवार यांनी विशेष सहकार्य केले. यावेळी विद्यार्थ्यांनी संस्था पदाधिकारी व प्राचार्य महोदय यांचे मनापासून आभार मानले आहे.






## बाबा कम्बलपोष व आयडियल पब्लिक शाळेत फूड फेस्टिवलचे आयोजन

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : बबिता शिवणकर

आर्णी : येथील बाबा कम्बलपोष उर्दू हायस्कूल व आयडियल पब्लिक स्कूलच्या संयुक्त विद्यमाने आज २२ जानेवारी रोजी फूड फेस्टिवलचे आयोजन करण्यात आले कार्यक्रमाचे उदघाटन आयडियल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सैयद मक्सूद अली पटेल, नगर सेवक सैयद रियाज, जावेद सोलंकी समद पहेलवान, पत्रकार नौशाद अली , नईम फानन, हाफीज उमेर,इरफान पटेल आदींनी केले. यावेळी या फेस्टिव्हलमध्ये विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे स्टॉल्स लावले होते . या मध्ये केजी १चा विद्यार्थी अरमान शेख याने स्वादिष्ट ब्रेड पकोडा, वर्ग १चा विद्यार्थी उक्बा हाफीज उमेर याने दही बडा , फातेमा सैयद हिने पास्ता आणि मोमोज,ताहेरा शेख हिने दोसा,जिनत शेख हिने पोट्याटो ट्विस्टर, शाहिद शेख याने पाणी पुरी तसेच वर्ग दहावीची विद्यार्थ्यांनी कु लायबा शेख हिने स्वादिष्ट आलु समोसा व अंडा पकोडा त्याच प्रमाणे पुरी भाजी, पाणी पुरी,भेळ,खस्ता, कच्चा चिवडा,दहिपुरी, विविध प्रकारचे आईस्क्रीम, बादाम शेक,खिचडा आदी स्टॉल्स लावण्यात आले होते या वेळी प्रमुख पाहुणे तसेच शिक्षक व पालकांनी विविध स्टॉल्सला भेट देऊन विविध व्यंजनाचा आस्वाद घेतला . या वेळी विद्यार्थ्यांनी मनोरंजनात्मक कार्यक्रम ही घेतला तसेच सामान्य ज्ञान च्या आधारावर विद्यार्थ्यांना प्रश्न ही विचारण्यात आले. ज्या मुलांनी अचुक उत्तर दिले त्यांना पुरस्कृत ही करण्यात आले. या कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी फिरदौस शाहीन सैयद, खालिद शेख, फौजिया आफरीन सैयद नौशाद अली,अजीज चौव्हाण, मुजीब शेख, सोहेल खान,अकरम बेग, तसेच आयडियल पब्लिक शाळेचे मुमताज बेग, अर्शिया शेख, रुखसार शेख, सानिया सैयद, शहेजीन शेख, आदींनी परिश्रम

# शासनसेवेत समाविष्ट नक्षलपीडित कुटुंबांच्या पाल्यांशी मुख्य सचिवांनी साधला संवाद

## मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष व कौशल्य विकास केंद्रास भेट आणि पाहणी

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे

गडचिरोली : नक्षलवादामुळे बाधित झालेल्या कुटुंबांच्या पुनर्वसनासाठी व त्यांच्या सामाजिक - आर्थिक सक्षमी करणासाठी नुकतेच शासन सेवेत सावावून घेण्यात आलेल्या उमेदवारांशी मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी संवाद साधला. यासोबतच विद्यार्थ्यांसाठी कौशल्य विकासाच्या सुविधा निर्माण करणाऱ्या इन्व्हेन्शन, इनोव्हेशन, इन्क्युबेशन अँड ट्रेनिंग सेंटर तसेच गरजू रुग्णांना तातडीची मदत देणाऱ्या मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाला काल भेट देवून त्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. नक्षलवादी हिंसाचारात गोपनीय माहितीदारांची हत्या झालेल्या कुटुंबांना दिलासा देण्यासाठी शासन निर्णयान्वये अशा कुटुंबातील एका सदस्यास शासनसेवेत सामावून घेण्याची तरतूद आहे. या तरतुदीनुसार ०१ जानेवारी २०२६ रोजी नक्षलपीडित कुटुंबातील २९ तरुणांना जिल्हाधिकारी कार्यालयाअंतर्गत शिपाई पदावर रुजू करून घेण्यात आले होते. यातील जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यरत उमेदवारांशी मुख्य सचिवांनी संवेदनशीलतेने संवाद साधला. कुटुंबातील घटना कधी घडली, सध्या घरची परिस्थिती कशी आहे, कुटुंबात कोण-कोण आहेत याची आस्थेने विचारपूस करत त्यांनी उमेदवारांना पुढील शिक्षण सुरू ठेवण्याचा सल्ला दिला तसेच शासकीय सेवेत प्रामाणिकपणे कार्य करून उज्ज्वल भविष्यासाठी वाटचाल करण्याची प्रेरणा दिली. मुख्य सचिवांनी जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली येथे मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षालाही आकस्मिक भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी संबंधित योजनांची कार्यपद्धती, वैद्यकीय उपचारासाठी लाभार्थ्यांना दिली जाणारी आर्थिक मदत तसेच निधी वितरणाची प्रक्रिया याबाबत सविस्तर माहिती घेतली. गरजू व गरीब रुग्णांना वेळेत, पारदर्शक आणि मानवी दृष्टिकोनातून मदत मिळेल, याची दक्षता घेण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या. यानंतर मुख्य सचिवांनी गोंडवाना विद्यापीठ परिसरातील सेंटर फॉर इन्व्हेन्शन, इनोव्हेशन, इन्क्युबेशन अँड ट्रेनिंग (CIIIT) येथे भेट देऊन विद्यार्थ्यांशी सविस्तर संवाद साधला. प्रशिक्षणाचे कालावधी, उपलब्ध अभ्यासक्रमांची संख्या, प्रमाणपत्र कोण देतात, प्रशिक्षणाची पद्धत तसेच प्रत्यक्ष कोणती कौशल्ये शिकविली जातात, याबाबत त्यांनी माहिती घेतली. विद्यार्थ्यांना संगणकावर प्रत्यक्ष प्रकल्प उघडून दाखवण्यास सांगत येथे उपलब्ध असलेली आधुनिक यंत्रसामग्री कशी कार्य करते याचीही त्यांनी विचारणा केली. या प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून गडचिरोलीतील विद्यार्थ्यांसाठी रोजगारक्षम कौशल्ये विकसित करण्याची महत्त्वपूर्ण संधी उपलब्ध झाली असून, या संधीचा पुरेपूर लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. यावेळी विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास गाडे, गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू प्रशांत बोकारे, जिल्हा कौशल्य विकास अधिकारी योगेंद्र शेंडे, अपर जिल्हाधिकारी नितीन गावंडे, निवासी उपजिल्हाधिकारी आशिष वानखेडे, वैद्यकीय कक्ष प्रमुख डॉ. मनोहर मडावी तसेच जिल्हा समन्वयक हर्षाली नैताम आदी उपस्थित होते.






# पाहिजेत

'दैनिक विदर्भ केसरी' या अग्रगण्य मराठी वृत्तपत्राचा विस्तार संपूर्ण विदर्भात होत आहे. लोकशाहीचा चौथा स्तंभ बळकट करण्यासाठी आणि जनसामान्यांचे प्रश्न मांडण्यासाठी आम्हाला विदर्भातील प्रत्येक जिल्हा आणि तालुका पातळीवर उत्साही, कल्पक आणि अनुभवी 'बातमीदार/प्रतिनिधी' नियुक्त करणे आहे.

## खालील सर्व जिल्हे आणि त्यांच्या अंतर्गत येणाऱ्या प्रत्येक तालुक्यासाठी प्रत्येकी १ प्रतिनिधीची नियुक्त करणे आहे

### नागपूर
जिल्हा प्रतिनिधी
- नागपूर शहर,
- काटोल, नरखेड,
- सावनेर, रामटेक,
- हिंगणा, उमरेड इ.


### अमरावती
जिल्हा प्रतिनिधी
- अमरावती शहर, अंजनगाव सुर्जी,
- चांदूर बाजार, मोर्शी
- धामणगाव रेल्वे, चांदुर रेल्वे,
- मोर्शी, तिवसा, वरुड, इतर

### अकोला
जिल्हा प्रतिनिधी
- अकोला शहर, अकोट,
- बाळापूर, पातूर,
- तेल्हारा, इ.

### यवतमाळ
जिल्हा प्रतिनिधी
- यवतमाळ शहर दिग्रस,
- दारव्हा,वणी,
- पांढरकवडा, आर्णी इ.

### बुलढाणा
जिल्हा प्रतिनिधी
- बुलढाणा, चिखली,
- खामगाव, शेगाव,
- मलकापूर, देऊळगाव
- राजा इ.

### चंद्रपूर
- चंद्रपूर शहर,
- बल्लारपूर,
- वरोरा, भद्रावती,
- राजुरा, ब्रह्मपुरी



### आकर्षक वेतन
संगणक चालक पेज डिझायनर.
- कोरल
- फोटोशॉप
- इनडिझाईन
- क्वॉर्क
- ज्ञान आवश्यक

- वर्धा जिल्हा वर्धा शहर, हिंगणघाट, आर्वी, देवळी, सेलू, कारंजा इ.
- गोंदिया गोंदिया, तिरोडा, अर्जुनी मोरगाव, देवरी, आमगाव इ.
- भंडारा भंडारा, तुमसर, पवनी, साकोली, लाखांदूर इ.
- गडचिरोली जिल्हा प्रतिनिधी गडचिरोली, अहेरी, चामोर्शी, देसाईगंज (वडसा), एटापल्ली इ.
- वाशिम शहर कारंजा लाड, रिसोड, मालेगाव, मानोरा.

वरील तालुका जिल्हा प्रतिनिधीसाठी इच्छुक असणाऱ्यानी आपला बायोडाटा (Biodata) आणि आधार कार्डची प्रत खालील व्हॉट्सअ‍ॅप नंबरवर पाठवावी किंवा संपर्क साधावा.

**कुणाल गायकवाड (जिल्हा प्रतिनिधी) मो.9579367474**
**अमोल कंटाळे (संपादक ) मो 9975532291**